दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

दशमीचे दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो ।
सिंहारूढ करी शस्त्रे सवळ ती घेऊनी हो ।।
शुभानिशुभांदीक राक्षस सर्वही मारूनी रणी हो ।।
विप्र रामदासा आश्रय दिधला निज चरणी हो ।।

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०९ | मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

फार्मर आयडीवरुन स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र बनवण्यास मनाई !

अनधिकृत कार्डांच्या निर्मिती-वितरणाबाबत कृषी विभागाचा इशारा; पैसे खर्च करण्यापूर्वी वैधता तपासण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

अॅग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र तयार करून त्याचे वितरण करण्यास केंद्र शासनाने मनाई केली आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारची कार्डे तयार केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्याने कृषी विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) चालकांनी अशा कार्डांची निर्मिती व वितरण तातडीने थांबवावे, तसेच शेतकऱ्यांनीही या नावाखाली पैसे खर्च करताना सावध राहावे, असे आवाहन विभागाने केले आहे.

ग्रीस्टॅकअंतर्गत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना स्वतंत्र डिजिटल ओळख क्रमांक म्हणजेच फार्मर आयडी दिला जातो. शेतकऱ्यांची ओळख आणि जमिनीशी संबंधित माहिती डिजिटल स्वरूपात एकत्रित करणे, तसेच विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ देण्याची प्रक्रिया सुलभ करणे, हा या प्रणालीचा उद्देश आहे. मात्र, फार्मर आयडी मिळणे आणि



त्याच्या आधारे स्वतंत्र ओळखपत्र छापून घेणे या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. फार्मर आयडीवर आधारित स्वतंत्र कार्ड तयार करून देणे ही अधिकृत प्रक्रिया नसल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र शेतकरी ओळखपत्रे तयार करून दिली जात असल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा कार्डांमुळे शेतकऱ्यांमध्ये त्याच्या ▶▶ पान २ वर

फार्मर आयडीची नोंदणी मात्र सुरूच

स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र तयार करण्यास मनाई करण्यात आल्याचा अर्थ फार्मर आयडीची नोंदणी बंद झाली आहे, असा नाही. शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसंबंधी नोंदणी किंवा अन्य सेवा घेताना अधिकृत पोर्टल आणि निर्धारित कार्यपद्धतीचाच वापर करावा. अधिकृत प्रक्रियेबाबत शंका असल्यास संबंधित शासकीय विभागाकडून माहितीची खात्री करून घ्यावी. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून अनधिकृत ओळखपत्रांची निर्मिती व वितरण रोखावे, असे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. त्यामुळे सीएससी चालकांसह शेतकऱ्यांनीही या सूचनांची दखल घेऊन अनधिकृत कार्डांच्या व्यवहारांपासून दूर राहणे आवश्यक आहे.

थोडक्यात...

आ.जितेंद्र आव्हाडांना जीवे मारण्याची धमक

मुंबई : बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे सिनेसृष्टीत खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना ताजी असतानाच, आता आमदार जितेंद्र आव्हाड यांनाही जीवे मारण्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. यासंदर्भात आव्हाड यांनी एक मोबाईल नंबर शेअर करत आपल्या ट्विटमध्ये लिहिले आहे की, एका इसमानी दोन ते तीन वेळा मला फोन केला, भ्रमणध्वनीवर अर्वाच्च भाषेत बोलून मारण्याची धमकी दिली. या धक्कादायक प्रकारानंतर आव्हाड यांचे कार्यकर्ते हेमंत वाणी यांनी संबंधित मोबाईल नंबरवर कॉल केला असता, त्या व्यक्तीने त्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिली. आधी जित्याला गोळ्या घालेन, नंतर तुला पण गोळ्या घालेन, घरच्या बाहेर येऊन गेलो, असे त्या व्यक्तीने वाणी यांना सांगितले. या अत्यंत गंभीर प्रकारानंतर हेमंत वाणी यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत याप्रकरणी रीतसर तक्रार दाखल केली आहे.

समान नागरी कायदा देशभर लागू करा-मुख्यमंत्री सरमा

दिसपूर: आसाममध्ये समान नागरी कायदा (युसीसी) अधिसूचित करण्यात आला असून, तो संपूर्ण देशात लागू केला पाहिजे, असे समर्थन आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केले. समान नागरी कायद्याच्या अभावामुळे मुस्लिम महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो, असा दावा त्यांनी केला. बहुपत्नीत्वासारख्या समस्यांवर उपाय करण्यासाठी देशात एकच समान कायदा असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात पत्रकारांशी बोलताना सरमा यांनी ही भूमिका मांडली. ते भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस हरीश द्विवेदी यांच्या तेलियाजोत गावातील निवासस्थानी त्यांच्या मातोश्रींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी आले होते. तसेच 'अँटी-एसआयआर' आंदोलन आणि सत्तांतराच्या मागणीवरून काँग्रेससह विरोधी पक्षांनी भाजपवर केलेल्या टीकेलाही सरमा यांनी प्रत्युत्तर दिले. सत्ता मतांच्या माध्यमातून मिळते, बळाचा वापर करून किंवा दबाव टाकून नाही, असे ते म्हणाले.

नेहा बोरा यांची दिल्ली उच्च न्यायालयात धाव

दिल्ली: ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेत विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी बजावलेल्या १० हजार रुपयांच्या पीस बाँड नोटीसला आव्हान दिले आहे. चौकशीदरम्यान शांतता राखण्यासाठी वैयक्तिक हमीपत्र आणि एका जामीनदाराची मागणी करणाऱ्या या नोटीसवर कारवाई होऊ नये, यासाठी त्यांनी न्यायालयाकडे तातडीने दिलासा आणि संरक्षणाची मागणी केली आहे. नेहा बोरा यांनी आपल्या याचिकेत १७ ऑक्टोबर रोजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १२६ आणि १३० अंतर्गत देण्यात आलेली नोटीस आणि त्यातून उद्भवणारी संपूर्ण कारवाई रद्द करण्याची मागणी केली आहे. १६ ऑक्टोबर रोजी मंडी हाऊस येथील घोषणाबाजी, जंतरमंतरवर कलम १६३ लागू असतानाही झालेली निदर्शने आणि कॅनॉट प्लेस येथे आंदोलनासाठी जमावाला भडकवल्याचा आरोप या नोटीसमध्ये त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. मात्र बोरा यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

सुटीची सूचना

आज दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी विजयादशमी निमित्त दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या दि.२१ ऑक्टोबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व एजंट यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१६ ऑक्टोबर २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ४.०० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,५००	२,७६६	२,६७२

ज्वारी/हायब्रिड : ८८.५० क्विंटल

२,७५१	६,०००	४,४१८

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : १.०० क्विंटल

१०,०००	१०,०००	१०,०००

उडीद : १४.०० क्विंटल

९,६००	९,८५१	९,७३७

बाजरी: १.०० क्विंटल

२,७५०	२,७५०	२,७५०

मुग: ८.०० क्विंटल

९,५००	९,५००	९,५००

सोयाबीन: ११९.५० क्विंटल

६,८१०	७,२२४	७,०२३

हरभरा: ७.५० क्विंटल

६,७००	७,६००	७,१३०

मनपा आयुक्त व जिल्हा परिषद सीईओंना दंड

विभागीय आयुक्तांनी केली स्वच्छतेसंदर्भात कारवाई

परभणी । प्रतिनिधी

शासकीय कार्यालयांतील स्वच्छता आणि कार्यालयीन शिस्तीबाबत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कठोर भूमिका घेतली आहे. परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान विविध शासकीय कार्यालयांची पाहणी करताना सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये अस्वच्छता आढळल्याने त्यांनी महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड ठोठावला.

शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता आणि शिस्त रुजविण्यासाठी जी. श्रीकांत यांनी १७ सप्टेंबरपासून विशेष मोहीम हाती घेतली. प्रत्येक सोमवारी कार्यालयीन कामकाजाच्या सुरुवातीचा एक तास श्रमदानातून कार्यालय स्वच्छ ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. कार्यालयप्रमुखांनी स्वतः पुढाकार घेऊन या उपक्रमाची अंमलबजावणी करावी, अशी त्यांची



अपेक्षा आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांतील शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छतागृहे, कार्यालय, कार्यालयातील कपाटे, छत, पंखे, टेबल-खुर्च्या तसेच नागरिकांसाठीच्या बैठक व्यवस्थेची नियमित स्वच्छता राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कार्यालयाच्या आवारापासून तर अंतर्गत कार्यालयामध्ये ही स्वच्छता असणे बंधनकारक ▶▶ पान २ वर

'गोकुळ' निवडणुकीत सतेज पाटील गटाची बाजी

२५ पैकी १६ जागांवर विजय

कोल्हापूर । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने बाजी मारली आहे. २५ संचालकपदांच्या जागांपैकी १६ जागा जिंकत सतेज पाटील गटाने गोकुळमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले.

गोकुळच्या निवडणुकीसाठी



१८ ऑक्टोबर रोजी विक्रमी ९९.९६ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर सोमवारी मतमोजणी सुरू झाली. सुरुवातीच्या टप्प्यात सतेज पाटील गटाचे अभिजित ▶▶ पान २ वर

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात तीन आरोपिंना अटक

मुंबई । प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली असून, त्यांना राजस्थानच्या कोटा शहरातून मुंबईत आणण्यात येत आहे. पोलीस उपायुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

रविवारी जुहूमध्ये अभिनेता टायगर श्रॉफ यांच्या कारवर गोळीबाराची घटना घडली होती. दुचाकीवरुन आलेल्या तिघांपैकी दोघांनी फायरिंग केले आणि



ते घटनास्थळावरुन पळून गेले. या आरोपींची बाईक आम्हाला अंधेरी रेल्वे स्थानकावर मिळाली. त्यानंतर, ४आम्ही पुढे फॉलोअप करत गेलो, आणि पुणे-जयपूर एक्सप्रेसने ते पुढे गेले. आम्ही माहिती काढून, ते कोणत्या बोगीत आहेत, याची माहिती जयपूर ▶▶ पान २ वर

सर्व विभागाच्या खर्चात २० टक्के कपात

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय, महसूलमंत्र्यांची माहिती

नागपूर । प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागाच्या खर्चात २० टक्के कपात करण्यात आली आहे. याबाबतच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) दिली. अवास्तव खर्च करण्यापेक्षा वास्तव खर्च करुन दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते नागपुरातील कोराडी येथे पत्रकारांशी बोलत होते. ''आपल्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने सूचना दिली होती की बजेटमधील सर्व विभागाचे पैसे कमी करुन दुष्काळी उपाययोजनांवर खर्च करावेत. मुख्यमंत्र्यांनी यावर सूचना दिल्या आहेत. २० टक्क्यांपर्यंत सर्व विभागाचा विकासाचा निधी कमी केला जाईल. थोडा विकास एक वर्ष झाला नाही. तसेच एखादा रस्ता कमी झाला तरी चालेल पण शेतकरी वाचला पाहिजे. शेतकऱ्याला जिवंत ठेवण्यासाठी चारा, पाणी टंचाई ▶▶ पान २ वर

शांततापूर्ण निदर्शने करणे हा मूलभूत अधिकार; उच्च न्यायालयाने केले स्पष्ट



मुंबई । प्रतिनिधी

शांततापूर्ण निदर्शने करणे हा एक मूलभूत अधिकार असला, तरी पोलिसांच्या कारवाईवर निर्बंध घालणारे सर्वसमावेशक आदेश देण्यापूर्वी निदर्शकांचे तपशील आणि त्यामुळे होणारी सार्वजनिक गैरसोय यांसारख्या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी नोंदवले.

मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला काही याचिकांवर उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. या याचिकांमध्ये ▶▶ पान २ वर

मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराचा भडका; चार जणांचा मृत्यू

मृतदेह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर ठेवत संतप्त निदर्शने

इम्फाळ । वृत्तसंस्था

मणिपूरमध्ये मैतेई आणि कुकी समुदायांमधील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला आहे. रविवारी (१८ ऑक्टोबर) रात्री आणि सोमवारी (१९ ऑक्टोबर) सकाळी घडलेल्या दोन स्वतंत्र हिंसक घटनांमध्ये



चार जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले आहेत. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील खामेनलोक परिसरात सरपण गोळा करण्यासाठी गेलेल्या ग्रामस्थांवर संशयित आदिवासी बंडखोरांनी गोळीबार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात तिघांचा मृत्यू झाला. दुसरीकडे, मैतेई आणि पांगल समुदायांची वस्ती असलेल्या भागातील संगीत ▶▶ पान २ वर

बीड जिल्ह्यातील तिन्ही दसरा मेळाव्याकडे राज्याचे लक्ष

नारायणगड भगवानभक्ती गड आणि मच्छिंद्रनाथ गडावर यंत्रणा सज्ज

बीड । प्रतिनिधी

राज्यात शिवसेनेचा मुंबईतील दसरा मेळावा, नागपूर येथे संघाचा दसरा मेळावा हे राज्यांना ठाऊक होते मात्र त्यानंतर बीड जिल्ह्यात गडावरील मेळाव्याची एक परंपरा सुरू झाली आहे. भगवानगडावर होणार दसरा मेळावा आता भगवान भक्ती गडावर होत असून, गेल्या तीन वर्षापासून नारायण गडावर देखील दसरा मेळावा होत आहे तर आता आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गडावर देखील आज दसरा मेळावा होत असून, या दसरा मेळाव्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये पूर्वी फक्त भगवानगडावर विजयादशमीनिमित्त दसरा मेळावा होत असायचा. पुढे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर तेथील महंत नामदेव शास्त्री महाराजांनी गडावर राजकीय नेत्याचा मेळावा नको म्हणत ते स्टेज उघडून टाकले. त्यानंतर स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी सुरू केलेली दसऱ्याची परंपरा त्यांची कन्या भाजपा नेत्या राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरू ठेवली. भगवान गडा ऐवजी संत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगाव येथे भगवान भक्ती गड निर्माण केला. गेल्या काही वर्षापासून या ठिकाणी ऊसतोड कामगार यांच्यासह सर्व समाजातील कार्यकर्त्यांचा, कष्टकऱ्यांचा हा दसरा मेळावा असतो. येथून पुढेच ऊस तोडणीला कामगार जातात. या दसरा मेळाव्याची तयारी सावरगाव येथील ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांनी आणि भाजपाला मानणारे पदाधिकारी व कार्यकर्ते तयारी करतात. मंगळवारी येथे हा दसरा मेळावा परंपरेनुसार ▶▶ पान २ वर



STAR Health Insurance
Star Health and allied insurance co.ltd
बीड कार्यालयासाठी खालील जागा भरणे आहे

अ.क्र.	पदनाम	संख्या	पात्रता
१	अंडर रायटर	१ जागा	कुठल्याही शाखेचा पदवीधर इंग्रजीवर प्रभुत्व असावे, अनुभव असल्यास
२	सेल्स मॅनेजर बीड गेवराई अंबाजोगाई परळी पाटोदा	५ जागा १ जागा १ जागा १ जागा १ जागा १ जागा	कुठल्याही शाखेचा पदवीधर सेल्सचा अनुभव असल्यास प्राधान्य

आकर्षक पगार + इन्सेंटिव्ह
इच्छुकांनी खालील पत्त्यावर थेट संपर्क साधावा.
--: संपर्क :--
ब्रँच मॅनेजर
अमर भालेराव
मो.नं.९९२२४२९००५
शाखा : दहीफळे प्लाझा रेशीम कार्यालयाशेजारी
राष्ट्रवादी भवन जवळ बार्शी रोड, बीड

अग्रलेख

अंडरवर्ल्ड'चे नवे 'डिजिटल मॉडेल' आणि गृहमंत्रालयाचे सुस्त कौतुक!

काळाच्या ओघात उद्योगधंदे बदलले, तंत्रज्ञान बदलले आणि त्यासोबतच भारतातील संघटित गुन्हेगारीचे म्हणजे 'अंडरवर्ल्ड'चे स्वरूपही पूर्णपणे कॉर्पोरेट आणि हायटेक झाले आहे. नव्वदच्या दशकात मुंबईला आपल्या इशाऱ्यावर नाचवणारा, दुरून कारवाया करणारा आणि पाकिस्तानात लपून बसलेला दाऊद इब्राहिम आजच्या 'नव्या भारताच्या' गँगस्टर संस्कृतीसमोर पार कालबाह्य, जुनाट आणि आऊटडेटेड वाटू लागला आहे. आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगात गँगस्टर कसा असावा, याचे एक आदर्श आणि थेट उदाहरण म्हणजे लॉरेन्स बिश्नोई! म्हणूनच आजच्या घडीला दाऊदपेक्षा बिश्नोई कितीतरी पटीने 'प्रगत', 'पारदर्शक' आणि प्रस्थापित व्यवस्थेला साजेसा वाटतो, असा उपरोधिक टोला कुणी मारल्यास त्यात नवल वाटू नये.

दाऊदची जुनी कार्यपद्धती किती ती संशयास्पद आणि बुरसटलेली होती. तो स्वतःला गुप्त ठेवायचा, कराचीच्या कोणत्या तरी अलिशान बंगल्यात बसून आंतरराष्ट्रीय सॅटेलाइट फोनवरून धमक्या द्यायचा. त्यात कोणताही थेटपणा नव्हता. याउलट बिश्नोईचा कारभार पहा–अत्यंत पारदर्शक आणि उघड! तो कोणत्याही लपवाछपवीवर विश्वास ठेवत नाही. देशातील अत्यंत सुरक्षित आणि केंद्रीय गृहमंत्रालयाच्या थेट देखरेखीखाली येणाऱ्या गुजरातच्या साबरमती तुरुंगात शासकीय पाहुणचार घेत असतानाही, त्याची गँग बाहेरच्या जगात अचूक 'ऑपरेशन्स' राबवते. तो फेसबुक, इंस्टाग्रामवर थेट पोस्ट टाकून किंवा तुरुंगातूनच परदेशी वृत्तवाहिन्यांना व्हिडिओ मुलाखती देऊन स्वतःच्या कृत्यांची जबाबदारी अगदी छातीठोकपणे स्वीकारतो. आजच्या 'डिजिटल इंडिया'च्या युगात यापेक्षा उत्तम सोशल मीडिया मॅनेजमेंट आणि 'वर्क फ्रॉम जेल'चे दुसरे कोणते आदर्श उदाहरण असू शकते? या संपूर्ण प्रकरणात सर्वात कौतुकास्पद भूमिका आहे ती म्हणजे आपल्या केंद्रीय गृह मंत्रालयाची आणि देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या कडक प्रशासनाची! देशाची सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा इतकी 'कडक' आणि 'नियंत्रणात' आहे की, एक कुख्यात संशयित आरोपी सुरक्षितपणे हाय–सिक्युरिटी तुरुंगात राहतो आणि त्याच्या नावाने बाहेर देशाच्या आर्थिक राजधानीत थेट हाय–प्रोफाइल गोळीबार होतात. अगदी कालचीच ताजी घटना पहा, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईतील जुहू येथील पुष्पा पार्कजवळ फुटबॉल खेळून परतत असताना बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्या बीएमडब्ल्यू कारवर अज्ञातांनी थेट गोळीबार केला. या गोळीबारात त्याचा चालक फिरदौस आणि उमेश चौहान नावाचा पादचारी गंभीर जखमी झाले. मुंबई पोलिसांच्या नाकावर टिच्चून झालेल्या या घटनेची जबाबदारीही बिश्नोई गँगच्या हस्तकांनी सोशल मीडियावरून अवघ्या काही तासांत स्वीकारली. पूर्वी दाऊद किंवा छोटा राजनसारख्या गुन्हेगारांना हाताळताना भारताच्या यंत्रणांना आंतरराष्ट्रीय कायदे, प्रत्यार्पण करार आणि गुप्तहेर संघटनांची प्रचंड मोठी मदत घ्यावी लागायची. पण आता? आता केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कार्यक्षम आणि शांत प्रशासनामुळे यंत्रणांना अशी कोणतीही आंतरराष्ट्रीय धावपळ करण्याची गरज उरलेली नाही. गुन्हेगार स्वतःहूनच एका सुरक्षित सरकारी इमारतीत शांतपणे बसलेला आहे! याला म्हणतात उत्तम 'रिसोर्स मॅनेजमेंट'. पोलीस यंत्रणा बिश्नोईला साबरमती तुरुंगातून बाहेर काढण्याच्या कायदेशीर प्रक्रियेत आणि केवळ चौकशीचे कागदपत्र बनवण्यात व्यस्त राहते, तोपर्यंत त्याचे सुमारे ७०० शूटर्सचे जाळे बाहेर अगदी सुरळीत चालते. हा गृह मंत्रालयाचा प्रशासकीय ताळमेळ आणि दुर्लक्षाची कमाल नक्कीच वाखाणण्याजोगी आहे. दाऊदने देशाबाहेर पळून जाऊन भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले होते, ज्यामुळे देशाची प्रतिमा मलिन झाली. परंतु, बिश्नोई हा संपूर्ण 'स्वदेशी' उत्पादनासारखा आहे. तो देशाच्या सीमेच्या आतच राहून, सरकारी व्यवस्थेच्या अन्नावर पोसला जात, आपले नेटवर्क चालवतो. तुरुंगातूनच त्याचे शूटर्स कुठे थेट बॉलिवूड अभिनेत्याच्या घराबाहेर तर कुठे मंत्र्यांवर गोळ्या झाडतात. ही एक प्रकारे आत्मनिर्भरतेचीच वेगळी आवृत्ती नव्हे काय? थोडक्यात सांगायचे तर, दाऊद हा जुन्या विचारांचा हिंसक गुन्हेगार होता, ज्याच्याकडे आधुनिक जनसंपर्काचा अभाव होता. याउलट, बिश्नोईचे आधुनिक गँगस्टर मॉडेल सध्याच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेशी पूर्णपणे सुसंगत असल्याचे दिसते. गृह मंत्रालयाची त्याच्यावर असलेली ही 'विशेष मेहेरबानी' आणि सुरक्षित हाताळणी पाहता, देशातील कायदा आणि सुव्यवस्था किती सुरक्षित आणि सुस्त हातांमध्ये आहे, याची प्रचिती सर्वसामान्य जनतेला रोज येत आहे. या नव्या युगाच्या डिजिटल गँगस्टरला आणि त्याला इतक्या सक्षमपणे तुरुंगात 'मॅनेज' करणाऱ्या यंत्रणेला जनतेचा मानाचा मुजरा !

शिक्षणासोबतच सांस्कृतिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर-सुभाषचंद्र सारडा

आदित्य शिक्षण संस्थेत नवरात्रोत्सवानिमित्त भव्य दांडिया महोत्सव उत्साहात ; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता सांस्कृतिक व कला गुणांच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांनी केले. आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या बी कॅम्पस मध्ये नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित भव्य दांडिया महोत्सवाच्या प्रसंगी ते बोलत होते. या महोत्सवात कॅम्पसमधील हजारो विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत दांडियाचा आनंद लुटत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ठेका आणि सांस्कृतिक वातावरणाने संपूर्ण कॅम्पस दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना सुभाषचंद्र सारडा पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, आपल्या ज्ञानात व कौशल्यात सातत्याने भर घालावी आणि भविष्यात आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करून समाजाची सेवा करावी असा मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाला प्रमुख पाहून म्हणून पेठ बीड पोलीस ठाण्याचे प्रमुख पोलीस निरीक्षक निलेश केळे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नवदुर्गेच्या विविध रूपांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. दांडिया महोत्सव आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. यावेळी सीए गिरीश गिल्डा, संचालिका डॉ. अदिती सारडा, प्रशासकीय अधिकारी डॉ. संतोष लहाने, पाटील मॅडम, रीलस्टार गौरव मालोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.व्यासपीठावर आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्याम भुतडा, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशु श्रीवास्तव, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक पवार यांच्यासह प्रा. सतीश कचरे, प्रा. विकास गर्जे, प्रा. प्रदीप काठोळे, प्रा. बालाजी बाहीरवाळ व प्रा. पुष्पराज राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना दैनंदिन अभ्यासाच्या ताणतणावातून विरंगुळा मिळावा, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ लाभून परस्परांतील स्नेहभाव वृद्धिगत व्हावा, हा या दांडिया महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची नंदेश्वर आणि ऐश्वर्या घुगे यांनी केले, तर आभार डॉ. सतीश कचरे आणि डॉ. व्ही. के. गर्जे यांनी मानले. हा भव्य महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. दीपक पवार, डॉ. डी. के. चव्हाण, प्रा. जी. ए. मुंडे, डॉ. व्ही. ए. सनानसे, प्रा. आर. व्ही. जाधव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आनंद आणि सांस्कृतिक एकात्मतेची एक अनोखी ऊर्जा निर्माण झाली.



विजयादशमीला बीडकरांना १,७३५ घरकुलांची भेट!

आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्या पाठपुराव्याला यश

बीड । प्रतिनिधी

मंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली बीड नगर पालिकेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे कटीबध्द आहेत. नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविण्याबरोबर शासकीय योजनांचा जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ कसा देता येईल यासाठी नगर पालिकेची टीम काम करत आहे. प्रधानमंत्री शहरी आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दुसऱ्या टप्यात १ हजार ६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्यात ७२९ आणि दुसऱ्या टप्यात १ हजार ६ अशा एकूण १७३५ घरकुलांची भेट विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर पात्र लाभार्थ्यांना मिळाली आहे.





बीड नगर पालिका अंतर्गत पंतप्रधान शहरी आवास योजनेकरिता पात्र लाभार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. सदरील अर्ज ऑनलाईन प्राप्त झाल्यानंतर त्याची पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी अनुदान मंजुर करण्यात आले आहे. पंतप्रधान शहरी आवास योजनेंतर्गत पहिल्या टप्यात ७२९ घरकुलांना मंजुरी मिळाली होती. त्यानंतर आता दुसऱ्या टप्यामध्ये देखील तब्बल १ हजार ६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. ऐन विजयादशमीच्या मुहूर्तावर बीड शहरातील १७३५ घरकुलांची भेट मिळाली आहे. ज्यांना हक्काचे घर नव्हते त्यांना त्यांच्या हक्काचा निवारा पंतप्रधान शहरी आवास योजनेंतर्गत मिळवून देण्यात नगर पालिका यशस्वी ठरली आहे. आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्यासह नगर पालिकेचे मुख्याधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक आणि प्रशासकीय टीम यांच्या प्रयत्नांना या माध्यमातून मोठे यश मिळाले आहे.

भगवान भक्तीगडावर उद्या भक्ती अन् शक्तीचा अनोखा संगम!

*** ना.पंकजाताई मुंडेंच्या दसरा मेळाव्याची जय्यत तयारी; राज्यभरातून जनसागर उसळणार**

*** यंदा प्रथमच सीसीटीव्हीच्या निगराणीखाली मेळावा; २० एकरांवर सभा, ११० एकरांवर पार्किंगची व्यवस्था**



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मभूमीत सावरगाव घाट येथे भगवान भक्तीगडावर उद्या मंगळवारी (ता. २०) दसरा मेळावा पार पडणार आहे. भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम मानल्या जाणाऱ्या या मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली असून, राज्याच्या विविध भागांतून भगवान बाबांचे अनुयायी आणि मुंडे समर्थक मोठ्या संख्येने दाखल होणार आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या मेळाव्यात ना .पंकजाताई मुंडे काय संकल्प देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्याला धार्मिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विचाराचा वारसा, वंचित आणि शोषित घटकांच्या सेवाभावनांशी जोडलेल्या या मेळाव्यातून दरवर्षी पंकजाताई मुंडे अठरा पगड जाती धर्मातील जनतेशी संवाद साधतात. भगवान बाबांच्या विचारांना अभिवादन करण्याबरोबरच या मेळाव्यातून जनतेला कोणता संदेश दिला जातो, याचीही उत्सुकता असते. त्यामुळे मेळाव्यातील त्यांच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दसरा मेळाव्यासाठी सुमारे २० एकर क्षेत्रावर सभेचे नियोजन करण्यात आले आहे. वाहनांच्या पार्किंगसाठी ११० एकर जागेची व्यवस्था करण्यात आली असून, २० बाय ४० आकाराचे व्यासपीठ आणि तीन हेलिपॅड तयार करण्यात आले आहेत. ना. पंकजाताई मुंडे दुपारी ११.३० वा. हेलिकॉप्टरने भगवान भक्ती गडावर दाखल होणार आहेत. त्यांच्या हस्ते स्मारकातील गर्भगृहात असलेल्या भगवान बाबांच्या मूर्तीची पूजा होईल, त्यानंतर पंकजाताई मुंडे मेळाव्याला मार्गदर्शन करणार आहेत. गेल्या बारा वर्षापासून भगवान भक्ती गडावर भव्य दिव्य लाखोंचा दसरा मेळावा संपन्न होतो. हे दसरा मेळाव्याचे सावरगाव घाट येथील तेरावे वर्ष आहे. यंदा प्रथमच सीसीटीव्हीच्या निगराणीखाली मेळावा होणार आहे. विशेष म्हणजे भगवान भक्तीगड स्मारक मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून या ठिकाणी वृक्षारोपण झाल्याने चहुबाजूने सावली झाली आहे. सावरगाव घाट येथील संत भगवानबाबा स्मारक मंदिर ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपहार आणि आदल्या दिवसापासून दाखल होणाऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

पान १ वरून...

फार्मर आयडीवरून स्वतंत्र शेतकरी

अधिकृततेबाबत संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. कार्डावर फार्मर आयडी नमूद असला, तरी त्याला शासनाची अधिकृत मान्यता आहे, असे समजू नये, असा इशारा विभागाने दिला आहे. अशा प्रकारची ओळखपत्रे तयार करून देण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून पैसे घेतले जात असल्यास, संबंधित कार्डाची वैधता आधी तपासणे आवश्यक आहे. केवळ आकर्षक कार्ड किंवा त्यावरील सरकारी योजनांचा उल्लेख पाहून त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

'गोकुळ' निवडणुकीत

तायशेटे आणि शशिकांत पाटील चुयेकर यांनी आघाडी घेत महायुतीसमोर मोठे आव्हान उभे केले. अखेर सतेज पाटील गटाने २५ पैकी १६ जागा जिंकल्या. गोकुळच्या २५ जागांसाठी एकूण ५० उमेदवार निवडणूक रिंगणात होते. महायुतीप्रणीत छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडी आणि सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडी यांच्यात थेट लढत झाली.

मनपा आयुक्त व जिल्हा

केले आहे. विशेष म्हणजे, सार्वजनिक स्वच्छतागृहांना कुलूप न लावता ती नागरिकांसाठी खुली ठेवणे आणि त्यांची स्वच्छता सुनिश्चित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. स्वच्छतेच्या नियमांचे पालन होते की नाही, यासाठी कार्यालयांना आकस्मिक भेटी देऊन तपासणी केली जात आहे. अस्वच्छता आढळल्यास संबंधित कार्यालयप्रमुखांना जबाबदार धरून कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे विभागातील सर्व कार्यालयप्रमुखांनी स्वच्छतेला केवळ औपचारिकता न मानता दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य भाग बनविण्याची गरज निर्माण झाली आहे. नागरिकांनी देखील अस्वच्छतेच्या संदर्भात प्रशासनाला लक्षात आणून द्यावे,असे आवाहन करण्यात आले आहे. स्वतः विभागीय आयुक्त दर सोमवारी छत्रपती संभाजीनगर मुख्यालयात एक तास देऊन स्वच्छतेसाठी आग्रही असतात. त्यांनी स्वतःही श्रमदान करून स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छतेचा अभाव आढळल्यास नागरिकांनी यासंदर्भात लक्षात आणून द्यावे. तसेच नागरिकांनी देखील सार्वजनिक स्वच्छतागृह वापरताना स्वच्छता पाळावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. सर्व शासकीय कार्यालय स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी मदत करावी असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व विभागाच्या खर्चात

हे विषय आधी हाताळले जातील. दुष्काळात ११ विभाग काम करत आहेत. ११ विभागांतून टँकरची मागणी आली आहे. या मागण्या पूर्ण करायच्या असतील तर थोडी खर्चात कपात करावी लागेल,'' असे महसूलमंत्र्यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समित्यांच्या निधीतून (डीपीसी) सिमेंट रस्ते करणे बंद केले आहे. यावर्षी सर्व रस्त्यांचे काम बंद करुन केवळ शेतरस्ते करणे सुरु ठेवू. नागरी भागात जलसंधारण, मृदसंधारण, पाणी साठे, जलपुनर्भरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग या गोष्टींवर भर दिला जात आहे. पण कोणताही योजना बंद करणार नाही. कोणत्याही योजनेचे अनुदान बंद करणार नाही. त्यामध्ये काही सुधारणा नक्कीच करु, असे त्यांनी नमूद केले.

टायगर श्रॉफ गोळीबार

पोलिसांना दिली. त्यानंतर, आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त राज तिलक रोशन यांनी दिली. मुंबईतून पळून गेलेल्या आरोपींच्या मागे आमची टीम होती, आमची टीम त्यांच्यापर्यंत पोहचली आणि ताब्यातही घेतले, हा तपास सुरूच आहे, हे खंडणीप्रकरण आहे. तसेच, हत्येच्या प्रयत्नाचा देखील गुन्हा आहे. याप्रकरणी, आम्ही कारवाई करत असून आरोपींकडे दोन वेपन होते, त्यातून ५–६ फायर झाले आहेत. आम्ही आरोपींना ताब्यात घेतले असून सध्या कोर्टाची प्रोसेस सुरू आहे. आता, फक्त प्राईमा इंट्रोगेशन सुरूच आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त राजतिलक रोशन यांनी दिली. या घटनेतील कोणीही आरोपी अल्पवयीन नाही, अशी माहिती देखील पोलिसांनी दिली. आम्हाला दिल्ली पोलीस, राजस्थान पोलीस, गुजरात पोलीस यांची मदत मिळाली आहे. आम्हाला जे पुढे चौकशीत येईल, ज्यांची नावे येतील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. सध्या, आरोपींकडे दुचाकी कोठून आली, कशी आली याची ही चौकशी सुरू आहे, असेही रोशन यांनी सांगितले. गोळीबाराच्या घटनेतील दोन आरोपी बिहारमधील सोनीपतचे असून एक बिहारचा आहे. त्यापैकी, एकाचे शिक्षण बारावी तर एकाचे आठवी शिक्षण आहे. दोन आरोपी एकमेकांना ओळखत होते, तिसरा आरोपी त्यांच्या संपर्कात कसा आला याची चौकशी आम्ही करू, असे पोलिसांनी म्हटले.

मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराचा

कार्यक्रमादरम्यान झालेल्या गोळीबारात २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या घटनांनंतर संतप्त नागरिकांनी दोन मृतदेह मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंग यांच्या निवासस्थानाबाहेर ठेवून निषेध नोंदवला. त्यामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेसमोर पुन्हा आव्हान उभे राहिले आहे. खामेनलोक परिसरातील हल्ल्यात तीन ग्रामस्थांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. पीडितांचे मृतदेह घेऊन संतप्त जमावाने इम्फाळमधील मुख्यमंत्र्यांच्या अतिसुरक्षित निवासस्थानाकडे मोर्चा वळवला. आंदोलकांनी दोन मृतदेह निवासस्थानाबाहेर ठेवून प्रशासनाविरोधात निषेध व्यक्त केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि लाठीचार्ज केला. त्यानंतर पोलिसांनी जमावाला हटवले. परिसरात तणावपूर्ण शांतता असून, सुरक्षा यंत्रणांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. दुसरी घटना मैतेई आणि पांगल समुदायांची वस्ती असलेल्या भागात संगीत कार्यक्रमादरम्यान घडली. यावेळी दगडफेक आणि गोळीबार झाल्याचे वृत्त आहे. गोळीबारात २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. दोन्ही घटनांनंतर सुरक्षा यंत्रणांनी घटनास्थळांची पाहणी करून परिसरातील बंदोबस्त वाढवला. दरम्यान, हिंसाचारात जखमी झालेल्या नागरिकांवर इम्फाळमधील राज मेडिसिटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री युमनाम खेमचंद सिंग यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्थानिक आमदार थोकचोम लोकेशोर सिंग यांनी या हिंसाचाराच्या प्रकरणात प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. तसेच संवेदनशील परिसराच्या जवळ असलेली 'सिनाई कॅम्प' ही सर्स्पेशन ऑफ ऑपरेशन्स (डेज) अंतर्गत असलेली छावणी हटवण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. परिसरातील सुरक्षेच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यास तणाव आणखी वाढू शकतो, असा इशारा त्यांनी दिला.

शांततापूर्ण निदर्शने करणे हा मूलभूत

आरोप करण्यात आला आहे की, मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध झालेल्या निदर्शनांच्या वेळी पोलिसांनी काही व्यक्तींना बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले होते. ॲडव्होकेट सावर देवरे यांनी दाखल केलेल्या एका जनहित याचिकेवर न्यायालय सुनावणी करत होते. या याचिकेत पोलिसांकडून अत्याचार केल्याचा आणि दिल्लीतील निदर्शनांच्या समर्थनार्थ शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या व्यक्तींना ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या याचिकेत पोलिसांना अशा शांततापूर्ण निदर्शनांमध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला ताब्यात न घेण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. खंडपीठाने नमूद केले की, प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे, परंतु आंदोलकांच्या पार्श्वभूमीचा विचार करणेही गरजेचे आहे. मात्र, ते आंदोलन शांततापूर्ण असावे. महाराष्ट्रात आपण पाहिले आहे की, पोलिसांनी खूप संयम पाळला आहे. तथापि, अशा निदर्शनांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींची पार्श्वभूमी तपासणे आवश्यक आहे. त्यांचा कोणताही गुन्हेगारी इतिहास नसावा. निष्पाप नागरिकांच्या मुखवट्याखाली गुन्हेगारांनी यात सहभागी होऊ नये, असे न्यायालयाने म्हटले. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ नोव्हेंबर रोजी निश्चित केली आहे. ॲडव्होकेट गायत्री सिंग यांनी सोमवारी चार व्यक्तींच्या वतीने एक अर्ज सादर केला. या व्यक्तींना गेल्या आठवड्यात शांततापूर्ण मोर्चात सहभागी झाल्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतले होते. ॲडव्होकेट सिंग यांनी सांगितले की, या चौघांना पूर्ण एक दिवस ताब्यात ठेवण्यात आले, त्यानंतर त्यांना घरी जाण्यास सांगण्यात आले आणि नंतर त्यांच्यावर हाऊस अरेस्ट लादण्यात आली. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील मिहिर देसाई यांनी इतर दोन व्यक्तींची शपथपत्रे सादर केली, ज्यांना पोलिसांनी त्यांच्या घरातून ताब्यात घेतले होते.

बीड जिल्ह्यातील तिन्ही दसरा

होत आहे. यासोबतच गेल्या तीन वर्षापासून मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे यांच्या उपस्थितीमध्ये नारायण गडावर देखील दसरा मेळावा होत आहे. गेल्या दोन वर्षापासून सुरू असलेल्या दसरा मेळाव्याचे हे तिसरे वर्ष असून, यापूर्वी माजी आमदार प्रा. सुनील धांडे यांनी या ठिकाणी दसरा मेळावा घेतला होता; मात्र तो अखंडपणे चालू राहिला नाही. आता मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत हा दसरा मेळावा सुरू झाला आहे. नारायणगडावर दसरा मेळाव्याची तयारी ट्रस्टी व परिसरातील नागरिकांनी केली आहे. हे दोन दसरा मेळावे असतानाच आता भाजपाचे आष्टी– पाटोदा– शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्या उपस्थितीमध्ये मच्छिंद्रनाथ गडावर देखील दसरा मेळावा होत आहे. नारायण गडावरील दसरा मेळाव्याला समाज म्हणून पाहिले जाते. भगवान भक्ती गडावरील मेळाव्याला मुंडे समर्थक आणि भाजप म्हणून पाहिले जाते मात्र आता त्यातच मच्छिंद्र गडावर होत असलेल्या दसरा मेळाव्यामुळे आमदार सुरेश धस व त्यांचे समर्थक मच्छिंद्रनाथ गडावर गर्दी करणार हे मात्र तेवढेच निश्चित आहे. बीड् जिल्ह्यातील या तिन्ही दसरा मेळाव्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे. कोणत्या गडावर अधिक गर्दी होते हे आता त्याच दिवशी दिसेल. विशेष म्हणजे भगवान भक्ती गड आणि नारायणगड या दसरा मेळाव्याला जाणाऱ्या भाविकांसाठी काही कार्यकर्त्यांनी पाणी व नाश्त्याची व्यवस्था रस्त्यांमध्ये केलेली आहे. भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्याला मंत्री पंकजा मुंडे यांचे बंधू आमदार धनंजय मुंडे. मच्छिंद्रनाथ गडावरील दसरा मेळावा आमदार सुरेश धस तर नारायण गडावरील दसरा मेळाव्याला मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे हे प्रमुख असणार आहेत. हे नेते गडावरून काय संदेश देतात याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

४

ओंकार चे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची गेवराई येथिली किसान अर्बन ला सदिच्छा भेट

गेवराईच्या कृषी प्रदर्शनाच्या माहितीपत्रिकेचे केले प्रकाशन

गेवराई । प्रतिनिधी

अल्पावधीतच काळामध्ये साखर उद्योगांमध्ये आपले नाव लौकिक करणाऱ्या ओंकार साखर कारखाना उद्योग समूहाचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी गेवराई येथील किसान अर्बन को ऑफ क्रेडिट गेवराई च्या मुख्य शाखेस सदिच्छा भेट दिली यावेळी संस्थेच्या वतीने संस्थेचे चेअरमन महेश बेदरे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने यावेळी त्यांचा येतोचित सत्कार केला.

साखर उद्योगाच्या माध्यमातून राज्यभरामध्ये शेतकऱ्यांना ओंकार साखर कारखान्याच्या माध्यमातून उच्चंकी दर देऊन शेतकऱ्यांना सुगीचे दिवस आणणाऱ्या ओंकार शुगर ने राज्यभरात २७ साखर कारखाने घेतले असून बीड जिल्ह्यातील परळी पांगरी येथिल वैद्यनाथ साखर कारखाना जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील रामेश्वर साखर कारखाना चालवत असून बीड जिल्ह्यातील बहुचर्चित कुटे तिरूमला उद्योग समूह नुकताच खरेदी केला असून यामुळे बीड लोकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत मराठवाड्यातील गोदाकाट च्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ओंकार साखर कारखान्यामुळे चांगला दर तर मिळणार आहेच भविष्यातील अतिरिक्त उसाचा प्रश्न ही सुटणार आहे याच निमित्ताने ओंकार साखर उद्योग समूहाचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी गेवराई येथील उद्योजक महेश बेदरे यांच्या किसान अर्बनला भेट देऊन डिसेंबर मध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या पत्रिकेचे प्रकाशन बोत्रे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला भविष्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कसलीही अडचण येऊन देणार नाही अशी ग्वाही यावेळी बोत्रे पाटील यांनी दिली याप्रसंगी किसान अर्बन चे चेअरमन महेश बेदरे, शिवनेरी अर्बनचे चेअरमन संजय जाधव यांच्या सह गेवराई परिसरातून आलेले शेतकरी यावेळी उपस्थित होते बोत्रे पाटील यांनी दिलेल्या सदिच्छा भेटीतून आगामी काळातील येणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ग्रुपच्या माध्यमातून नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होईल असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६

थोडक्यात



जिजामाता महाविद्यालयात मुख्यमंत्री 'आरोग्य संवाद' हा उपक्रम उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग आणि जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणारा 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद – जागर आरोग्याचा' हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे आणि निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा उद्देश होता. कार्यक्रमासाठी नोडल अधिकारी म्हणून श्री. सुनील शिंगारे सर आणि डॉ. हरिप्रिया मॅडम यांनी विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रा. अनुराधा दुर्गम यांनी नशामुक्ती अभियान, प्रा. रुपाली तांदळे यांनी मानसिक आरोग्य, प्रा. प्रवीण कुमार यांनी आत्महत्या प्रतिबंध, प्रा. दीपिका धनेरिया यांनी निरोगी जीवनशैली, तर प्रा. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी युवा शक्ती, राष्ट्रनिर्माण आणि विकसित भारत या विषयांवर मार्गदर्शन केले. विविध विषयांवरील या संवादातून विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व समजून घेण्याची तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची संधी मिळाली.यावेळी जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य एन. विनोथ कुमार आणि जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. पॉल राज हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच कार्यालयीन अधीक्षक महादू वाघ, इरफान पठाण यांच्यासह दोन्ही महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, नर्सिंग आणि बीपीटीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्यदायी जीवनशैली, व्यसनमुक्त समाज आणि सक्षम युवा पिढी घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

चौसाळ्याच्या हॉटेल कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

चौसाळा । प्रतिनिधी

येथील हॉटेल जानकी बियर बार या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या



कामगाराने हॉटेलमध्ये वरच्या मजल्यावर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दिनांक १९ ८ २०२६ रोजी वार सोमवार दुपारी घडली सदर प्रकरणी माहिती अशी की चौसाळा येथील हॉटेल जानकी बियर बार मध्ये कामगार सतीश अण्णा जाधव वय ३० हा कामगार काम करीत होता हॉटेलच्या वरच्या मजल्यावर जाऊन पंख्याला दोर लावून आत्महत्या केल्याची घटना घडली सदर प्रकरणी चौसाळा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस करतायेत सदर तरुण हा मनमिळावू स्वभावाचा होता त्याच्या मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे त्याच्या पाठीमागे पत्नी मुलगा दोन मुली आई वडील असा परिवार आहे.

दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी गावनिहाय सूक्ष्म नियोजन करा ! - जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीचा प्रभावीपणे मुकाबला करण्यासाठी प्रशासन आणि ग्रामपंचायतींनी एकत्रितपणे नियोजन करावे , उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर व्यवस्थापन करावे आणि प्रत्येक गावाने दुष्काळ निवारणासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा , असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले . पिण्याच्या पाण्याची उपलब्धता , जलसंधारणाची कामे , टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा , गावपातळीवरील समस्या आणि दुष्काळाच्या काळात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने नियोजन भवन , जिल्हाधिकारी कार्यालय , बीड येथे दुष्काळ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी दुष्काळाचा सामना करण्यासाठी प्रशासनाबरोबरच सरपंच , ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांनीही सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले . या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीतीन रहेमान , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप व ओंकार बिडकर , जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत देशपांडे , उपअभियंता संजय चोपडे , पंचायत समिती बीडचे पशुसंवर्धन अधिकारी दत्तात्रय इंगोले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी , सरपंच , ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि संबंधित गावांतील नागरिक उपस्थित होते . बैठकीचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी केले .

पिण्याच्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्याची गरज : दुष्काळी परिस्थितीत सर्वांत महत्त्वाचा विषय म्हणजे पिण्याच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन . उपलब्ध पाणीसाठा किती आहे , त्याचा वापर कोणत्या पद्धतीने केला जात आहे आणि आगामी काळात गावांची पाण्याची गरज कशी भागविता येईल , याचे सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्पष्ट केले . पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण करताना पाण्याचा अपव्यय होणार नाही , याची दक्षता घेणे गरजेचे आहे . ग्रामपंचायतींनी आपल्या गावातील पाण्याची उपलब्धता , पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती आणि संभाव्य अडचणी यांचा विचार करून नियोजन करावे , असे त्यांनी सांगितले . दुष्काळाच्या काळात उपलब्ध असलेला प्रत्येक पाणीसाठा महत्त्वाचा



पाणीसाठे सुरक्षित ठेवण्यासह जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे निर्देश; सरपंचांनी मांडल्या गावोगावच्या समस्या, प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद

असतो . त्यामुळे तलाव , विहिरी आणि अन्य जलस्रोतांमधील पाणी जपून वापरणे आवश्यक आहे . पाणीसाठे सुरक्षित ठेवण्याबरोबरच तलावांमधून अवैधरीत्या पाणीउपसा होणार नाही , याची दक्षता घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या . पाण्याचे नियोजन केवळ प्रशासकीय पातळीवर करून चालणार नाही , तर ग्रामपंचायती आणि स्थानिक नागरिकांनीही त्यात सहभाग घेतला पाहिजे . गावातील पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्या वेळेत समोर आणून त्यावर उपाययोजना करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावाच्या गरजा लक्षात घेऊन दुष्काळ निवारणाचा स्वतंत्र आराखडा तयार करावा , असे निर्देशही या बैठकीत देण्यात आले . गावातील पाण्याची उपलब्धता , पाणीपुरवठ्याची साधने , दुरुस्तीची आवश्यकता असलेली कामे , टँकरची गरज आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी करता येणाऱ्या उपाययोजना यांचा विचार करून नियोजन करणे महत्त्वाचे आहे . गावनिहाय नियोजन केल्यास गरजेनुसार उपाययोजनांना प्राधान्य देता येईल आणि उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करता येईल , हा या सूचनांमागील महत्त्वाचा उद्देश आहे .

अवैध पाणीउपसा रोखून पाणीसाठ्यांचे संरक्षण करा

दुष्काळाच्या काळात पाणीसाठ्यांचे संरक्षण करणे ही प्रशासनासह ग्रामपंचायती आणि नागरिकांचीही जबाबदारी आहे . तलावांमधील उपलब्ध पाणी अनधिकृतरीत्या उपसले जाणार नाही , याकडे लक्ष देणे आवश्यक आहे . पाणीसाठे सुरक्षित राहिले तर त्यांचा नियोजनबद्ध वापर करता येईल . त्यामुळे तलाव क्षेत्रात होणाऱ्या पाणीउपशावर लक्ष ठेवावे आणि उपलब्ध पाण्याचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता घ्यावी , असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले . पाण्याची उपलब्धता कमी होत असताना त्याचा वापर अधिक जबाबदारीने करणे आवश्यक ठरते . अशा वेळी पाण्याचा अपव्यय टाळणे , जलस्रोतांची देखभाल करणे आणि गावातील नागरिकांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देणे महत्त्वाचे आहे . पाण्याची समस्या निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आधीच नियोजन करून संभाव्य अडचणी कमी करण्यावर भर देण्याची गरज या बैठकीत अधोरेखित करण्यात आली. जलसंधारणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी अडविणे , जमिनीत पाणी मुरण्यास मदत करणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे शक्य होते . त्यामुळे गावातील भौगोलिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन योग्य कामांची निवड करावी . संबंधित विभागांनी उपलब्ध योजनांचा आणि कामांच्या संधींचा विचार करून गावपातळीवर नियोजन करावे , अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.गावनिहाय नियोजनातून दुष्काळय निवारणाला गती : या बैठकीत पाणीपुरवठा , जलसंधारण , तलावांचे संरक्षण , टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्याची शुद्धता , चारा लागवडीची शक्यता आणि नागरिकांच्या सामाजिक अडचणी अशा विविध मुद्द्यांवर चर्चा झाली . दुष्काळाच्या परिस्थितीत तातडीच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच भविष्यात पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली . प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वतंत्र दुष्काळ निवारण आराखडा तयार करणे , उपलब्ध पाणीसाठ्याचे संरक्षण करणे आणि जलसंधारणाची कामे अधिकाधिक प्रमाणात हाती घेणे या बाबी या बैठकीतील प्रमुख मुद्दे ठरले . त्याचबरोबर पाणीपुरवठ्याशी संबंधित अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी आणि गावोगावच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन व ग्रामपंचायतींमध्ये समन्वय आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले . दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी प्रशासन , लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे . उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर , जलस्रोतांचे संरक्षण , जलसंधारणाची कामे आणि गावनिहाय नियोजन या माध्यमातून दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना दिशा मिळू शकते . सर्वांनी एकजुटीने काम करून प्रत्येक गाव पाणीसमृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत , असे आवाहन या बैठकीत करण्यात आले .

कुंबेफळच्या श्री सिद्धिविनायक मंदिराच्या भव्य बांधकामाचे दसऱ्याला भूमिपूजन

कुंबेफळ । प्रतिनिधी

ता. केज, जि. बीड : केज तालुक्यातील कुंबेफळ येथील ग्रामदैवत व भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र श्री सिद्धिविनायक मंदिराच्या भव्य बांधकामाचा भूमिपूजन सोहळा विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास ग्रामस्थांसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळ, कुंबेफळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कुंबेफळ येथील श्री सिद्धिविनायक मंदिर हे ग्रामस्थांच्या श्रद्धेचे आणि भक्तीचे केंद्र आहे. ग्रामदैवताची वास्तू भव्य, आकर्षक आणि पुढील पिढ्यांसाठी आदर्श ठरावी, या उद्देशाने ग्रामस्थांनी एकत्र येत मंदिराच्या बांधकामासाठी सढळ हाताने मदत केली आहे. ग्रामस्थांची एकजूट, श्रद्धा आणि सहकार्याच्या बळावर या भव्य मंदिराची उभारणी करण्यात येणार आहे.

संपूर्ण मंदिर चिरेबंदी स्वरूपात उभारण्यात



ग्रामदैवताची आकर्षक चिरेबंदी वास्तू उभारणार; ग्रामस्थांच्या एकजुटीतून ऐतिहासिक मंदिर साकारण्याचा संकल्प

येणार असून, या वास्तूला ऐतिहासिक मंदिराची साक्ष ठरेल असे स्वरूप देण्याचा ग्रामस्थांचा संकल्प आहे. धार्मिक परंपरेचे जतन व्हावे, भावी पिढ्यांना आपल्या ग्रामदैवताच्या महात्म्याची ओळख व्हावी आणि गावाच्या वैभवात भर पडावी, या भावनेतून मंदिर बांधकामाचे नियोजन करण्यात आले आहे.

या मंदिराच्या भव्य बांधकामाचा भूमिपूजन सोहळा ह.भ.प. गुरुवर्य महंत श्री. लक्ष्मण महाराज येंगे बाबा, महाधिपती, व्यंकटस्वामी महाराज संस्थान, वेंकटपूर यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

भूमिपूजन सोहळा असा :

– दिनांक : मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

– वेळ : सकाळी ८.२१ वाजता

– स्थळ : श्री क्षेत्र सिद्धिविनायक मंदिर, कुंबेफळ, ता. केज, जि. बीड

या मंगल सोहळ्याला सर्व ग्रामस्थ, भाविक भक्त आणि परिसरातील गणेशभक्तांनी उपस्थित राहून श्री सिद्धिविनायकाचे आशीर्वाद घ्यावेत व या धार्मिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळ, कुंबेफळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरुन...

माजलगाव-तेलगाव रस्त्यावरील

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०४६७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ व १०६(१) अंतर्गत दिलीप बिल्डकॉन कंपनी, संबंधित कंत्राटदार आणि संबंधित अभियंता यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्याची मागणी

या भीषण अपघातात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या कुटुंबांचा आर्थिक आधारही हिरावला गेला आहे. त्यामुळे मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत तातडीने मंजूर करावी, अशी विनंती आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. रस्त्याची दुरवस्था, वारंवार होणारे अपघात आणि निष्पाप नागरिकांचे जाणारे बळी लक्षात घेता, संबंधित यंत्रणेने या मार्गाच्या सुरक्षिततेसाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळण्याबरोबरच भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी रस्त्याची दुरुस्ती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

'चंपावती दांडिया महोत्सव'

करण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली. बीड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी उपस्थित महिला-भगिनींना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देत, सर्वांनी या सांस्कृतिक सोहळ्याचा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन केले. स्पर्धेनंतर विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सोन्याची नथ, कांजीवरम साडी, पैठणी यांसह विविध आकर्षक बक्षिसे व स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण अंबाजोगाई येथील गीता कुलकर्णी आणि गेवराई येथील टीना परदेशी यांनी केले. महिला- भगिनींचा अभूतपूर्व प्रतिसाद, नियोजनबद्ध आयोजन आणि सांस्कृतिक परंपरेला दिलेली सुंदर अभिव्यक्ती यामुळे 'चंपावती दांडिया महोत्सव-२०२६' संस्मरणीय ठरला. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी अनिकेत कांबळे, प्रबुद्ध कोरडे, श्रेयश समुद्रे आणि तेजस खरात, पोपटराव राख यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार नितीन क्षीरसागर यांनी केले महिला-भगिनींच्या आग्रहातून साकारलेला हा महोत्सव केवळ दांडियापुरता मर्यादित न राहता सांस्कृतिक, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्राला जोडणारा एक भव्य सोहळा ठरला. बीडच्या सांस्कृतिक परंपरेत नवा उत्साह निर्माण करत 'चंपावती दांडिया महोत्सव-२०२६'ने पुढील वर्षाच्या आयोजनाबाबतही मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

लाभार्थ्यांनी कागदपत्रांसह

प्रक्रिया महत्त्वाची आहे. मात्र काही लाभार्थ्यांना शारीरिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे ही प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिलासा मिळावा, यासाठी पर्यायी पडताळणीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांचे स्वतःचे फेस ऑथेंटिकेशन होणे शक्य नसल्यास, योजनेच्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र पती, पत्नी किंवा मुलांच्या चेहरा पडताळणीचा पर्याय उपलब्ध होऊ शकतो. मात्र त्यासाठी संबंधित प्रकरणाची तपासणी, पात्रतेची पडताळणी आणि सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक राहणार आहे.

नागरिकांशी संवेदनशिलपणे

उलट न बोलता वरिष्ठांशी बोलण्यास सांगावे. वैयक्तीक लाभाच्या योजनाची कार्यवाही तातडीने करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील सीडीपीओ, पर्यवेक्षिका, विस्तार अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक उपस्थित होते.

भगवान भक्तीगडावरील


राजकीय आणि सामाजिक वाटचालीत सर्वसामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. समाजातील सर्व स्तरातील लोकांना सोबत घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी सुरू केलेली दसरा मेळाव्याची परंपरा आजही अनेकांच्या मनात श्रद्धा, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करते. भगवान भक्तीगडावरील दसरा मेळावा हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून समाजाच्या भावना, श्रद्धा आणि एकजुटीचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी दिलेला विचारांचा वारसा लोकनेत्या पंकजाताई मुंडे पुढे नेत असून, या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र येण्याची संधी मिळते. ग्रामीण भागातील नागरिक, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पदाधिकारी यांचा या मेळाव्यात मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. दसरा मेळाव्याच्या निमित्ताने समाजातील प्रश्न, अडचणी आणि अपेक्षा मांडण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध होते. अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक सलोखा, परस्पर संवाद आणि संघटनात्मक एकजूट अधिक मजबूत होण्यास मदत होते. त्यामुळे या परंपरेशी जोडलेल्या प्रत्येकाने मेळाव्यात सहभागी होऊन आपली उपस्थिती नोंदवावी, असेही बाळासाहेब सानप यांनी म्हटले.

भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्याला दरवर्षी समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यंदाही मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांतून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या परंपरेची शोभा वाढवावी. पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी आपापल्या भागातील नागरिकांशी संपर्क साधून त्यांना मेळाव्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन भाजप नेते बाळासाहेब सानप यांनी केले आहे.

सतीश चव्हाण यांनी १५ वर्षांतील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कामांचा हिशोब द्यावा – विष्णु उगले

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार सतीश चव्हाण यांनी गेल्या १५ वर्षांत विद्यार्थ्यांसाठी नेमकी कोणती कामे केली, याचा सविस्तर लेखाजोखा जनतेसमोर मांडावा, अशी मागणी पदवीधर अंशकालीन कर्मचारी संघाचे माजलगाव तालुकाध्यक्ष विष्णू उगले यांनी केली आहे.



पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, महाविद्यालयीन शुल्क, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर काय ठोस काम केले, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे, असे उगले यांनी म्हटले.

केवळ आश्वासने नकोत, कामांचा लेखाजोखा द्या!

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होत असताना प्रत्यक्षात किती प्रश्न मार्गी लागले, किती विद्यार्थ्यांना न्याय मिळाला आणि पदवीधरांच्या रोजगारासाठी कोणते ठोस प्रयत्न करण्यात आले, याची माहिती सार्वजनिक करावी. गेल्या अनेक वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कामांचा पुराव्यासह अहवाल सतीश चव्हाण यांनी जनतेसमोर सादर करावा, अशी मागणी विष्णू उगले यांनी केली. मागच्या तीन टर्म आम्ही यांना पाठिंबा देत आलोय मात्र त्यांनी आमच्या प्रश्नांची कधीच दखल घेतली नाही व आम्ही त्यांना भेटायला गेले असता दोन वेळा त्यांनी आमच्या संघटनाशी बोलणे टाळले याच बरोबर आजही ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत. शैक्षणिक शुल्क, रोजगाराच्या संधी आणि शिक्षणातील असमानता यांसारखे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आश्वासनांपेक्षा आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती मतदारांसमोर येणे आवश्यक आहे, असेही उगले यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उत्तरदायित्व निश्चित व्हावे!

मराठवाड्यातील पदवीधर आणि विद्यार्थी हे केवळ निवडणुकीपुरते महत्त्वाचे नसून त्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम होणे आवश्यक आहे. त्यामुळे सतीश चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळातील विद्यार्थीहिताच्या कामांचा सविस्तर लेखाजोखा मांडावा, हीच आमची मागणी असल्याचे पदवीधर अंशकालीन कारभारी संघटनेचे विष्णू उगले यांनी स्पष्ट केले. म्हणून सतीश चव्हाण सोडून इतर कोणालाही मतदान करण्याचा निर्णय माजलगाव पदवीधर अंशकालीन कर्मचारी संघानेने घेतला आहे

माणिकराव देशमुख देवडीकर कृषी पत्रकारिता पुरस्काराचे मुंबईत उध्दव ठाकरे यांच्या हस्ते वितरण

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दिला जाणारा स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख देवडीकर कृषी पत्रकारिता पुरस्कार यंदा कोल्हापूर येथील सकाळचे पत्रकार सुनील पाटील यांना प्रदान करण्यात आला आहे.. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचया सभागृहात झालेल्या एका भव्य समारंभात शिवसेना पक्ष प्रमुख उध्दवजी ठाकरे यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला गेला. अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त, ज्येष्ठ पत्रकार एस.एम. देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.. ५००० रूपये रोख, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे..



माणिकराव देशमुख यांना कृषी क्षेत्रात विशेष रूची होती.. त्यामुळे कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांचा माणिकराव देशमुख कृषी पुरस्काराने सत्कार करण्यात यावा अशी सूचना देशमुख परिवाराने केल्याने गेल्यावर्षी पासून परिषदेने हा पुरस्कार सुरू केला आहे..

माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने देखील दरवर्षी स्वातंत्र्य सैनिक माणिकराव देशमुख यांच्या नावे बीड जिल्ह्यातील कृषी, सामाजिक कार्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा देखील सन्मान केला जातो.. हा सोहळा देवडी किंवा बीडमध्ये घेतला जातो.. या पुरस्कारांची घोषणा देखील लवकरच करण्यात येईल अशी माहिती प्रतिष्ठानच्या सचिव शोभनाताई देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

पिंपरखेड येथे ग्रामीण विकास अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे दिमाखात उद्घाटन!

एपीआय वर्षा होगाडे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन; वंदना प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून वंदना प्रतिष्ठान संचलित ग्रामीण विकास अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. वडवणी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) वर्षा होगाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. दिवंगत वंदना खळगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सुरू करण्यात आलेला हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय गेल्या सुमारे ३० वर्षांपासून शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. विद्यार्थ्यांना, पालकांना आणि समाजातील सर्व घटकांना प्रेरणा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या वाचनालयाच्या माध्यमातून केले जात आहे. वाचनालयाच्या अध्यक्षा दिवंगत वंदना खळगे यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढता येणार नसली, तरी त्यांच्या स्मृती जपण्यासाठी संचालक मंडळाने वंदना प्रतिष्ठानची स्थापना करून अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा अभिनव निर्णय घेतला.

विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि सातत्य जोपासावे : एपीआय वर्षा होगाडे

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना एपीआय वर्षा होगाडे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी पहाटे लवकर उठावे, घरातील कामांत आई-वडिलांना मदत करावी आणि दररोज किमान तीन तास नियमित अभ्यास करावा. शुद्धलेखनाचा सराव करून स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सातत्याने मेहनत घ्यावी. यश सहज मिळत नसून त्यासाठी आळस झटकून कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. या अभ्यासिका व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्यांनी वैयक्तिक सुरक्षिततेबाबत विशेष जागरूक राहण्याचे आवाहन केले. कोणत्याही व्यक्तीचा अयोग्य किंवा अस्वस्थ वाटणारा स्पर्श झाल्यास त्याकडे दुर्लक्ष



न करता आई-वडील, शिक्षक किंवा विश्वासू वरिष्ठांना त्वरित सांगावे आणि संबंधित व्यक्तीपासून सुरक्षित अंतर ठेवावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. तसेच बालविवाहापासून दूर राहून कायदेशीर वयातच विवाह करावा आणि आपल्या शिक्षणाला व उज्ज्वल भवितव्याला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जागरूकता आणि सकारात्मक विचारांची प्रेरणा निर्माण झाली.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनकार्याची आणि शैक्षणिक योगदानाची माहिती देण्यात आली. वाचनाची आवड, ज्ञानाची साधना आणि ध्येय निश्चित करून प्रयत्न करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे सचिव प्रकाश खळगे यांनी केले. त्यांनी अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची उद्दिष्टे आणि भविष्यातील कार्याची माहिती दिली. वंदना प्रतिष्ठान व वाचनालयाच्या अध्यक्षा विशाखा प्रकाश खळगे यांनी एपीआय वर्षा होगाडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मान्यवरांची उपस्थिती : या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, उपसरपंच अशोकराव निपटे, दत्तगुरू अर्बन बँकेचे अध्यक्ष गजानन निपटे, पप्पू मोरे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन श्रीनिवास निपटे, तंटामुक्ती अध्यक्ष रुक्षराज निपटे, ज्ञानोबा गायकवाड, पोलीस पाटील विकास शिंदे, ग्रामपंचायत सदस्य पप्पू निपटे, बळीराजा बँकेचे अध्यक्ष पप्पू भैया निपटे यांच्यासह परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक करांडे सर, मगर सर, डोंगरदिवे सर, शिंदे सर, ढगे सर, शेंडगे मॅडम, शेंडगे सर, भास्कर खळगे, हिरामण खळगे, ग्रामपंचायत सदस्य केसर खळगे, वाचनालयाच्या ग्रंथपाल शिलाताई सुखदेव उजगरे, अंगणवाडी सेविका अग्नी खळगे, पल्लवी खळगे, शितल खळगे आणि आनंद खळगे यांच्यासह वडवणी, नाथापूर, केसापुरी व परभणी परिसरातील महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने नवीन वास्तूचा गृहप्रवेश तसेच स्मृतिदिनानिमित्त आयोजित धार्मिक व सामाजिक कार्यक्रम बोधाचार्य सखाराम वावळकर आणि ज्येष्ठ बुद्धाचार्य अण्णासाहेब मस्के यांच्या हस्ते पार पडला. उपस्थित मान्यवरांचा वस्त्रदानाने, तर महिलांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. सर्व उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी नवी संधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी योग्य वातावरण, अभ्यासाची सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दिवंगत वंदना खळगे यांच्या स्मृतींना अभिवादन करत शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न वंदना प्रतिष्ठान आणि छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाने केला आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वाचनालयाचे पदाधिकारी, वंदना प्रतिष्ठानचे सदस्य, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६
४

रब्बी हंगामातील विविध योजनांच्या लाभासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

पुणे / प्रतिनिधी

रब्बी हंगामात शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे,सुधारित बियाणांचा वापर वाढावा आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा,या उद्देशाने कृषी विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान (अन्नधान्य व वाणिज्यिक पिके),कडधान्य आत्मनिर्भरता अभियान आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळीतधान्य) सन २०२६-२७ अंतर्गत रब्बी हंगामासाठी विविध घटकांचा लाभ घेण्याकरिता महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले असल्याच्या पार्श्वभूमीवर या योजनांमध्ये महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात येणार आहे. त्याचबरोबर अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि दिव्यांग लाभार्थ्यांनाही योजनांच्या लाभासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत भुईमूग, सूर्यफूल आणि करडई या तेलबिया पिकांच्या उत्पादनवाढीसाठी गट पीक प्रात्यक्षिके आणि प्रमाणित बियाणे वितरणाचे घटक राबविण्यात येणार आहेत. यामध्ये भुईमूग पिकाच्या गट पीक प्रात्यक्षिकासाठी प्रतिहेक्टर १४ हजार रुपये, सूर्यफूल पिकासाठी प्रतिहेक्टर ९ हजार रुपये, तर करडई पिकासाठी प्रतिहेक्टर ८ हजार रुपये



अनुदान देण्यात येणार आहे. या घटकांचा लाभ शेतकरी गट,शेतकरी उत्पादक संघटना, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांना घेता येणार आहे. याच अभियानांतर्गत पाच वर्षांच्या आतील वाणांच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी भुईमूग पिकाला प्रतिकिलो ११४ रुपये, सूर्यफूल पिकाला प्रतिकिलो ४७४ रुपये आणि करडई पिकाला प्रतिकिलो १०५ रुपये अनुदान देण्यात येणार आहे.या बियाणे वितरण घटकासाठी वैयक्तिक शेतकरी पात्र राहणार आहेत. कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत हरभरा पिकाच्या उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यात आला आहे.हरभऱ्याच्या गट पीक प्रात्यक्षिकासाठी प्रतिहेक्टर १० हजार रुपये अनुदान देण्यात येणार असून, या घटकासाठी शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संघटना,शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्था पात्र असतील. हरभरा पिकाच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी पाच वर्षांच्या आतील वाणांना प्रतिकिलो ६० रुपये,तर पाच वर्षांवरील परंतु दहा वर्षांच्या आतील वाणांना प्रतिकिलो ४० रुपये अनुदान देण्यात येणार आहे.या दोन्ही घटकांचा लाभ वैयक्तिक शेतकऱ्यांना घेता येणार आहे. कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत ऊस पिकामध्ये एक डोळा पट्टा पद्धत आणि ऊस व हरभरा आंतरपीक प्रात्यक्षिकासाठी प्रतिहेक्टर ९ हजार रुपये अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. या घटकासाठी शेतकरी गट,शेतकरी उत्पादक संघटना,शेतकरी उत्पादक कंपन्या,कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था तसेच वैयक्तिक शेतकरी पात्र राहणार आहेत. याशिवाय ऊस पिकासाठी सुपर केन नर्सरी या घटकांतर्गत १० हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के,यानुसार अनुदान देण्यात येणार आहे.या घटकाचा लाभ शेतकरी गट,शेतकरी उत्पादक संघटना,शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांना घेता येणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत गहू आणि रब्बी ज्वारी या पिकांसाठीही विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे.गहू पिकाच्या सलग गट पीक प्रात्यक्षिकासाठी प्रतिहेक्टर ९ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे.या घटकासाठी शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संघटना,शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था पात्र असतील.

रब्बी ज्वारी पिकाच्या गट पीक प्रात्यक्षिकासाठी प्रतिहेक्टर ७ हजार ५०० रुपये अनुदान देण्यात येणार आहे. यासाठीही शेतकरी गट,शेतकरी उत्पादक संघटना,शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था पात्र राहणार आहेत. रब्बी ज्वारीच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी दहा वर्षांच्या आतील वाणांना प्रतिकिलो ३० रुपये,तर दहा वर्षांवरील वाणांना प्रतिकिलो १५ रुपये अनुदान देण्यात येणार आहे.या दोन्ही घटकांसाठी वैयक्तिक शेतकरी पात्र राहणार आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी स्वतः किंवा नजीकच्या सामाईक सेवा केंद्रामार्फत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत.अर्ज करताना पोर्टलवरील 'बियाणे वितरण', 'प्रात्यक्षिक' आणि 'सुपर केन नर्सरी' या संबंधित पर्यायांची निवड करून अर्ज भरता येणार आहेत. रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सुधारित वाणांचे बियाणे,पीक प्रात्यक्षिके आणि आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा,यासाठी कृषी विभागाने या योजनांच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली आहे.विशेषतः महिला शेतकरी,अनुसूचित जाती-जमाती आणि दिव्यांग लाभार्थ्यांनी या योजनांचा प्राधान्याने लाभ घ्यावा. पात्र शेतकरी,शेतकरी गट,शेतकरी उत्पादक संघटना, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांनी विलंब न करता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावे. योजनांच्या पात्रता अटी,अनुदान आणि अर्ज प्रक्रियेबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

दिन विशेष

जागतिक दिवस:
लोकशक्ती दिन, जागतिक अस्थिसुषिरता दिन

महत्वाच्या घटना

१५६८ : साली मुघल शासक अकबर यांनी चित्तोडगढ वर हल्ला केला.
१७७४ : साली कोलकाता(तत्कालीन कलकत्ता) ही भारताची राजधानी बनली होती.
१८२२ : साली ब्रिटीश वर्तमानपत्र 'लंडन संडे टाईम्स' चा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला होता.
१९०४ : चिली आणि बोलिव्हिया यांनी शांतता करारावर सह्या करून उभय देशांतील सीमा निश्चित केल्या.
१९४७ : अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात (पहिल्यांदाच) राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९६२ : चीनने भारतावर आक्रमण केले. लडाख आणि ईशान्य भारतात (नेफा) चीनचे सैन्य घुसले आणि त्यांनी भारतीय ठाणी काबीज केली.
१९६९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची अकोला येथे स्थापना
१९७० : हरितक्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोरलॉग यांना नोबेल पारितोषिक जाहीर
१९७१ : मंदीच्या तडाख्यामुळे नेपाळमधील रोखेबाजार कोसळला.
१९७३ : सिडनी ऑपेरा हाऊस चे उद्घाटन एलिझाबेथ (दुसरी) यांनी केले.
१९५० : कृ. भा. बाबर यांनी 'समाजशिक्षणमाला' स्थापन केली. नवशिक्षीत आणि ग्रामीण भागातील जिज्ञासूंना ज्ञानाच्या विविध अंगांची ओळख व्हावी यासाठी श्री. बाबर व त्यांच्या कन्या डॉ. सरोजिनी बाबर यांनी या मालेत शेकडो पुस्तके प्रकाशित केली.
१९५२ : केनियामधे आणीबाणी जाहीर करण्यात आली. जोमो केन्याटा व इतर प्रमुख नेत्यांचे अटकसत्र सुरू.
१९९१ : उत्तरकाशी मधे ६.८ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन १,००० पेक्षा अधिक जण मृत्यूमुखी पडले.
१९९५ : 'ट्रोंटिएथ सेंचुरी फॉक्स' या संस्थेकडून हिन्दी चित्रपटांतील अभिनेते देव आनंद यांना 'मॅन ऑफ द सेंचुरी' हा सन्मान जाहीर
२००१ : रंगभूमीवर सुमारे ४० वर्षे विविध प्रयोग करणारे पंडित सत्यदेव दुबे यांना 'विष्णुदास भावे गौरवपदक' जाहीर
२०११ : लिबीयन गृहयुद्ध राष्ट्रीय परिवर्तन परिषदेच्या च्या सैनिकांनी हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांना पकडून ठार केले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५५ : गोवर्धनराम त्रिपाठी गुजराथी लेखक, 'सरस्वतीचंद्र' हा गाजलेला चित्रपट त्यांच्याच चार भागांतील कादंबरीवर आधारलेला आहे. (मृत्यू: ४ जानेवारी १९०७ मुंबई)
१८९१ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २४ जुलै १९७४)
१८९३ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ ऑगस्ट १९७८)
१९१६ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (मृत्यू: २९ ऑगस्ट १९६९)
१९२० : साली भारतीय कायदेपंडित, मुत्सद्दी आणि पश्चिम बंगालमधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व पश्चिम बंगाल राज्याचे माजी मुख्यमंत्री, पंजाब राज्याचे माजी राज्यपाल व अमेरिकेचे भारतीय राजदूत अशी अष्टपैलू कामगिरी सांभाळणारे सिद्धार्थ शंकर राय यांचा जन्मदिन.
१९२७ : भारतीय कवी आणि समीक्षक गुंटूर सेशंदर शर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे २००७)
१९३० : साली भारताची राजधानी दिल्ली येथील उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश लीला सेठ यांचा जन्मदिन.
१९६३ : नवजोत सिंग सिद्धू क्रिकेटपटू, समालोचक व खासदार
१९७८ : वीरेन्द्र सहवाग धडाकेबाज फलंदाज

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९० : सर रिचर्ड बर्टन ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर (जन्म: १९ मार्च १८२१)
१९८२ : भारतीय वरिष्ठ नागरी सेवक अधिकारी तसचं, केरळ आणि मध्य प्रदेश राज्यांचे राज्यपाल निरंजन नाथ वांचू यांचे निधन.
१९६१ : व्ही. एस. गुहा मानववंशशास्त्रज्ञ. १९४६ मध्ये त्यांच्या प्रयत्नांनी कलकत्ता येथे भारतीय मानववंशशास्त्र संशोधन संस्था स्थापन झाली. भारतात जनगणनेच्या कार्यात त्यांनी मौलिक भर घातली. (जन्म:)
१९६४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १० ऑगस्ट १८७४)
१९७४ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (जन्म: २० जानेवारी १८९८)
१९८४ : पॉल डायरॅक नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ८ ऑगस्ट १९०२)
१९९६ : दि. वि. तथा 'बंडोपंत' गोखले पत्रकार, युद्धशास्त्राचे अभ्यासक (जन्म:)
१९९९ : माधवराव लिमये समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार (जन्म:१९१५)
२००९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (जन्म: ४ मे १९२९)
२०१० : पार्थसारथी शर्मा क्रिकेटपटू (जन्म: ५ जानेवारी १९४८)
२०११ : मुअम्मर गडाफी लिबीयाचे हुकूमशहा (जन्म: ७ जून १९४२)

कमीत कमी आहारात जास्त दूध देणारी 'राठी गाय'!



भारतामध्ये पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. आपल्याला सगळ्यांना माहिती आहे की पशुपालन व्यवसायात दूध उत्पादन हे आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. पशुपालनामध्ये गाई मोठ्या प्रमाणात पाळल्या जातात. गाईंच्या अनेक प्रकारच्या जाती भारतात आहेत. त्यापैकी काही देशी तर काही संकरित प्रकारच्या आहेत. प्रत्येक जातीचे वेगवेगळे वैशिष्ट्ये असून दूध देण्याची क्षमता देखील वेगवेगळे आहे.

कमीत कमी आहारात जास्त दूध देणारी 'राठी गाय' :अनेक प्रकारच्या जाती गाईंच्या आहेत परंतु यामध्ये राठी गाय (ठरींहळ डु) आहे ही एक फार महत्त्वपूर्ण आणि फायदेशीर जात आहे. सर्वाधिक दूध देणारी गाय म्हणून तिला सगळीकडे ओळखले जाते. या जातीच्या गाई मुख्यत्वेकरून राजस्थानच्या बिकानेर पासून ते पंजाब राज्याच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशात आढळतात. याच गाईंना राजस्थानमध्ये कामधेनु असे देखील म्हटले जाते. या गाईंच्या गुणधर्मांचा विचार केला तर साहिवाल जातीच्या गायीशी मिळते जुळते या गायीचे गुणधर्म आहेत. इतर जातींच्या गाई पेक्षा दूध देण्याची क्षमता जास्त असते. जर वातावरण पोषक असेल तर पशुपालक या गाईपासून जास्त दुधाचे उत्पन्न मिळवू शकतात. अगदी कमीत कमी आहारात जास्तीत जास्त दूध देण्याची क्षमता या गाई मध्ये आहे. राठी गाईचे दूध देण्याची क्षमता प्रति वेताला १०६२ ते २८१० दहा लिटर असते. जर आपल्याला गाईची निवड करण्याची कसब असेल तर आपण अधिक दूध उत्पादन करू शकता. प्रतिदिन या गाई आठ ते दहा लिटर दूध देत असतात. परंतु आपण जर समतोल आणि पौष्टिक आहार या गायींना खायला दिला तर २५ ते ३० लिटरपर्यंत क्षमता दूध देण्याची या गाईंची आहे.

राठी गायीचे वैशिष्ट्ये : या गाई दिसायला आकर्षक असून चेहरा रूंद असतो तसेच या गाईंचा आकार मध्यम स्वरुपाचा असतो. गाईंच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. तसेच शिंगे मध्यम आकाराचे असून मागे वळलेली असतात. शेपटी लांब असून वय झालेल्या गाईंचे वजन हे साधारण २८० ते ३०० किलोग्रॅम असते. या गाईंच्या सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कोणत्याही वातावरणात आणि परिसरात राहू शकतात.

भुरी रोगाचे अशा पद्धतीने करा नियंत्रण



भाजीपाला पिके असो की फळपिके विविध रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. योग्य वेळी त्यांचे व्यवस्थित नियंत्रण मिळवण्यासाठी व्यवस्थापन केले तर होणारे नुकसान टाळता येते. नाही तर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसतो.

भुरी रोगाची नेमकी माहिती : थंड आणि कोरडे हवामान हे भुरी रोगाच्या वाढीसाठी पोषक असते. भुरी रोगाचा प्रादुर्भाव अगदी सुरुवातीला जुन्या किंवा बुध्याजवळील पानांवर आढळून येतो.

या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास झाडाच्या पानांवर, फुलांच्या कळीवर तसेच देठावर भुरकट रंगाचे बुरशीचे ठिपके दिसून येतात. नंतर कालांतराने झाडाची पाने पिवळी पडतात व गळतात. या रोगाचे सगळ्यात महत्त्वाच्या वाईट परिणाम म्हणजे प्रकाशसंश्लेषण क्रियेमध्ये बाधा निर्माण होते. या रोगाचा प्रादुर्भाव मुख्यत्वेकरून मिरची, टोमॅटो, वांगी, भेंडी, वेलवर्गीय भाजीपाला तसेच विविध फुलपिके आणि फळपिकांवर मोठ्या प्रमाणात होतो.

भुरी रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन : यासाठी सगळ्यात महत्वाचे म्हणजे पीक लागवडीसाठी वाणांची निवड करताना ती या रोगास सहनशील असतील अशा वाणांची करावी. पीक लागवड करण्याअगोदर जमिनीतील अगोदरच्या पिकांचे अवशेष पूर्णपणे नष्ट करून घ्यावे तसेच पिकांची फेरपालट करणे फार गरजेचे आहे. तसेच पिकाला पोटॅश हे अन्नद्रव्य कमी पडले तर या रोगाला पीक बळी पडते त्यामुळे सुरुवातीच्या काळापासून नत्रयुक्त खतांचा वापर संतुलित प्रमाणात करून पोटॅश आणि कॅल्शियम युक्त खतांचा वापर वाढवावा जेणेकरून पीक हे भुरि आणि इतर रोगांना बळी पडणार नाही. पिकांच्या प्लॉट मध्ये आद्रता टिकवून ठेवण्यासाठी शक्य असल्यास तुषार सिंचनाचा वापर करावा.

भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी जैविक उपाय : भुरी रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास सुरुवातीला जैविक पद्धतीचा अवलंब करावा यासाठी ऍपेलोमायसेस क्वीस्कवालिस पाच मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन दहा ते पंधरा दिवसांच्या अंतराने दोन ते तीन वेळा पिकात फवारणी करावी.

कारण पेलोमायसेस क्वीस्कवालिस ची बुरशी भुरी रोगाच्या बुरशीवर उपजिवीका करते त्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. कीड आणि रोगांचा वरोधी लढण्याची क्षमता वाढवण्यासाठी पिकांवर सिलिका घटक असणारे सिलिकॉन एक मिली प्रति लिटर तसेच कायनेटिन घटक असणारे किटोगार्ड दोन मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन पिकात फुलोरा अवस्थेत पूर्वी दोन वेळा फवारणी करावी.

भुरी रोगाचे रासायनिक नियंत्रण : शेवटच्या टप्प्यात रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी रासायनिक घटकांचा वापर करावा. यामध्ये गंधक ८०% दोन ग्रॅम प्रति लिटर पाणी (वेलवर्गीय पीक उन्हाळा हंगाम वगळता) मायक्लोबुटानील (दहा टक्के डब्ल्यू) असलेले बुरशीनाशक ०.५ ग्रॅम किंवा झिनेब ६८% + हेक्साकोनेझोल (चार टक्के डब्ल्यू) असलेले बुरशीनाशक दोन ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. वरील पद्धतीने नियोजन केल्यास रासायनिक घटकांचा वापर कमी होईल तसेच रोग नियंत्रणात चांगली मदत होऊन उत्पादन वाढीसाठी मदत होईल.

कांदा साठवणुकीतील नुकसान कमी करण्यासाठी हे करा

कांद्याची साठवणूक करताना मोड येणे, कांदा सडणे (बुरशी लागणे) आणि वजनात घट होणे यांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी आणि कांदा दीर्घकाळ टिकवण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात:

काढणीपूर्वी व काढणीच्या वेळची काळजी :

योग्य वेळेत काढणी: शेतातील ५०% कांद्याची पात मान मोडून जमिनीवर पडल्यावरच कांद्याची काढणी करावी. अपरिपक्व किंवा अतिपक्व कांदा साठवणुकीत लवकर खराब होतो. मान वाळवणे : कांदा काढल्यानंतर पात न छाटता २ ते ३ दिवस शेतातच ओळीने अशा प्रकारे ठेवावा, जेणेकरून एका पेंढीची पात दुसऱ्या पेंढीच्या कांद्याला झाकेल (कांद्याला थेट ऊन लागू नये). पातीची छाटणी: मान चांगली सुकल्यानंतर मान २.५ ते ३ सें.मी. (१ इंच) अंतर ठेवून छाटावी. मान अगदी कांद्यालगत छाटू नये.

वर्गीकरण : साठवणुकीपूर्वी कांद्याची वर्गवारी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जोड कांदे, डेंगळे आलेले (फूल आलेले), पोकळ मानांचे, दुखापत झालेले, सडलेले आणि पातळ सालीचे कांदे वेगळे काढावेत. फक्त मध्यम ते मोठ्या आकाराचे, कडक आणि पूर्ण वाळलेली साठवणुकीयोग्य पात



असणारेच कांदे साठवावेत.

साठवणूक गृहाची रचना (कांदा चाळ) : हवेशीर रचना: कांदा साठवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने बांधलेली 'कांदा चाळ' वापरावी. कांद्याच्या थरातून हवा खेळती राहणे अत्यंत गरजेचे आहे. उंची व थराची जाडी: चाळीत कांद्याची साठवण ३ ते ४ फुटांपेक्षा जास्त उंचीपर्यंत करू नये. जास्त जाड थर असल्यास तळातील कांद्याला हवा मिळत नाही व उष्णतेमुळे सड सुरू होते. जमिनीपासून अंतर: साठवणूक गृहाचा तळ जमिनीपासून किमान १ ते १.५ फूट उंच असावा आणि तळाशी जाळी किंवा बांबूची रचना असावी. छताची रचना: चाळीचे छत पत्र्याचे असल्यास त्यावर गवत/पेंढा टाकावा किंवा सिमेंट/कापडी छताचा वापर करावा, जेणेकरून आत उष्णता वाढणार नाही.

रासायनिक व जैविक व्यवस्थापन : काढणीपूर्वी फवारणी: काढणीच्या १५ ते २० दिवस आधी मॅन्कोझेब (चरपल्ेशल - २.५ ग्रॅम/लीटर) किंवा कार्बेंडाझिम या बुरशीनाशकाची फवारणी केल्यास साठवणुकीत बुरशीचा प्रादुर्भाव कमी होतो. मोड येणे रोखणे: साठवणुकीत मोड येऊ नयेत म्हणून कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने काढणीच्या २० ते २५ दिवस आधी मॅलेईक हायड्रॅझाईड (चक-३०) ची फवारणी करता येते. साठवणुकीदरम्यानची काळजी : नियमित पाहणी: महिन्यातून किमान एकदा कांद्याची पाहणी करून सडलेले किंवा मोड आलेले कांदे त्वरित बाहेर काढावेत, जेणेकरून इतर कांदे खराब होणार नाहीत. आर्द्रता व तापमान नियंत्रण: साठवणूक गृहात जास्त दमट हवामान किंवा पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यात हवा खेळती राहण्यासाठी पंख्याचा वापर करता येतो. अस्वीकारण: ही माहिती सामान्य माहितीवर आधारित असून वेबदुनिया याची जबाबदारी घेत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ञांचा सल्ला घ्यावा.

५ हजारांची भीक नको; शेतकऱ्यांना हक्काचे ५० हजार द्या - राजेंद्र आमटे

शेतकरी हक्क मोर्चाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'भीक मागो' आंदोलन

बीड। प्रतिनिधी

दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, सोयाबीन आणि कापूस ही प्रमुख पिके हातची गेली आहेत. पेरणीपासून ते काढणीपर्यंत केलेला खर्च मातीत गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत दसरा-दिवाळीसारखे सण तोंडावर आले असताना सरकारकडून भरीव आर्थिक मदतीची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना केवळ पाच हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याने शेतकरी हक्क मोर्चाने संताप व्यक्त केला आहे. 'मुख्यमंत्री साहेब, पाच हजारांची भीक नको; शेतकऱ्यांना हक्काचे ५० हजार रुपये द्या,'अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केली. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचे गांभीर्य



लक्षात घेऊन दिवाळीपूर्वी भरीव नुकसानभरपाई देण्याऐवजी पाच हजार रुपयांची मदत जाहीर करून सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केल्याचा आरोप करत शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात 'भीक मागो' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकऱ्यांनी प्रतीकात्मकरीत्या भीक मागून रुपये जमा करत. ही रक्कम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिवाळी साजरी करण्यासाठी पाठविण्याच्या भूमिकेतून आंदोलनकर्त्यांनी सरकारचा निषेध केला.

'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला' अशी परिस्थिती शेतकऱ्यांची झाली आहे. बाजारात तेलाचा डबा खरेदी करण्यासाठीच सुमारे २,८०० रुपये खर्च येत असेल, तर पाच हजार रुपयांत शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करायची? मुलाबाळांचे सणासुदीचे खर्च कसे भागवायचे? शेतीत गुंतवलेले पैसेही वसूल झालेले नसताना शेतकऱ्यांनी संसार कसा चालवायचा, असे सवाल राजेंद्र आमटे यांनी उपस्थित केले. शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देण्याऐवजी त्यांच्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करून दिवाळीपूर्वी प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर ५० हजार रुपये नुकसानभरपाई जमा करावी, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या हक्काचा पीकविमा तातडीने मिळावा, तसेच दुष्काळामुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, रामधन जमाले, अशोक येडे, शेख युनुस, , बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, हनुमान घोडके , ज्ञानेश्वर राऊत,बळीराम म्हेत्रे,खाजाभाई पठाण,राजाभाऊ साळुंखे, किष्किंधा पांचाळ ,अशोक सुरवसे, गणेश वटारे, संतोष म्हेत्रे,बबन आमटे,सुदाम करपे, माऊली शिंदे, राजाभाऊ वीर,पठाण सरफराज, नारायण म्हेत्रे, श्रीकांत ठाकरे, कृष्णा राठोड, सुभाष गिराम यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते.

आंदोलनातील प्रमुख मागण्या

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्या.
पात्र शेतकऱ्यांचा प्रलंबित पीकविमा तातडीने अदा करा.
दुष्काळामुळे झालेल्या पीक नुकसानीची योग्य भरपाई द्या.
शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत न देता प्रत्यक्ष नुकसानीच्या प्रमाणात आर्थिक सहाय्य द्या.

लातूरमध्ये तरुणाला नग्न करून बेदम मारहाण

पार्श्वभागात पेट्रोल टाकून अमानुष छळ; पोलिसांकडून एकाला अटक, इतरांचा शोध सुरू

लातूर

लातूरमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका तरुणाला नग्न करून त्याला पट्ट्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. इतकेच नव्हे तर, अमानुषतेची सर्व हद्द पार करत या तरुणाच्या पार्श्वभागात पेट्रोल टाकल्याचा भयंकर प्रकारही समोर आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.या मारहाणीचा संपूर्ण थरार आरोपींनी स्वतःच्या मोबाईलमध्ये चित्रित केला. मारहाण करणाऱ्या या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या टोळक्यानेच नंतर हा व्हिडिओ सोशल मीडियावरील विविध ग्रुप्सवर व्हायरल केला. हा अत्यंत विचलित करणारा व्हिडिओ समोर आल्यानंतरच या भयंकर गुन्ह्याला वाचा फुटली आणि हे प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले.

या गंभीर घटनेची दखल घेत स्थानिक गुन्हे शाखा आणि एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. मात्र, या गुन्ह्यात सामील असलेले अन्य तीन ते चार आरोपी अद्याप फरार असून, पोलिस पथके त्यांचा कसून शोध घेत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, मारहाणीची ही अमानुष घटना काही महिन्यांपूर्वी घडली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, या तरुणाला मारहाण करण्यामागचे नेमके कारण काय, ही घटना नेमकी कधी घडली आणि आताच हा व्हिडिओ व्हायरल करण्यामागचा आरोपींचा उद्देश काय होता, याचा सखोल तपास सध्या पोलीस करत आहेत. या भयंकर प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

महायुतीच्या विजयासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे- रावसाहेब दानवे

महायुतीच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा – ना. मेघना बोर्डीकर

जालना। प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालयात रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी जालना महानगर जिल्ह्याची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचाराची दिशा ठरविणे आणि निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणे तसेच बूथ यंत्रणा सक्षमपणे उभी करणे या बैठकीचा उद्देश होता. यावेळी राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून सतीश चव्हाण यांना विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

बैठकीत बोलताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, या निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची आहे. पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचून त्यांच्याशी संपर्क साधणे, मतदानासाठी त्यांना प्रोत्साहित करणे व मतदान केंद्रापर्यंत त्यांना आणून महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. सतीश चव्हाण यांच्या मत पत्रिकेवरील नावासमोर क्रमांक एक लिहून मतदान करून घ्यावे व मतदानाच्या दिवशीला जबाबदारी दिलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी सकाळी सात वाजता मतदान केंद्रावर पोहचून सायंकाळी चार वाजता मतदानाची वेळ संपल्या नंतर पूर्ण प्रक्रिया करूनच बाहेर पडावे असे आवाहन त्यांनी मार्गदर्शन करताना केले. महायुतीतील सर्व घटक पक्षांनी काम केल्यानंतर महायुतीच्या



उमेदवाराचा विजय निश्चित होईल, परंतु त्या करिता महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी उमेदवाराच्या विजयाकरिता शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करावे, कोणीही गाफील न राहता आतापासूनच कामाला लागावे, असे हि त्यांनी सांगितले. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश चव्हाण यांना विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पदवीधर मतदारांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन राज्याच्या राज्यमंत्री ना. मेघना ताई बोर्डीकर यांनी केले. या बैठकीस जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे कैलास गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंटयाल, जि.प. सदस्या आशाताई पांडे, सभापती अशोक पांगारकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, संध्याताई देठे, पूनम स्वामी, भाग्यश्री जोगस, मा.जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव, नगसेविका सुशीलाताई दानवे, श्रद्धा साळवे, सखुबाई पणबिसरे, सुषमाताई खरात, स्नेहा जोशी, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, राजेंद्र भोसले, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, वसंत शिंदे, सुनील पवार, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, मोहन राऊत, अमोल धानुरे, संजय डोंगरे, अर्जुन गेही, मदन सर, मांटे सर, दिलीप अर्जुने, कपिल भूरेवाल, महेश निकम, महावीर ढक्का, जगदीश भरतीया, बाबुराव पवार, सिद्धिविनायक मुळे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सैन्यात नोकरीचे आमिष दाखवून युवकाची २३ लाखांची फसवणूक

अहिल्यानगर

सैन्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून दोघांची २३.३९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ऋषीकेश महादेव गोल्हार (वय २५, रा. भाळवणी, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश कारभारी थोपटे (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) आणि अक्षय उत्तम हरणे (रा. नांदेड) या दोन संशयित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०२३ पासून ते आजतागायत ही घटना घडली. त्यांच्या तक्रार अर्जाची चौकशी करून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दोघांनी फिर्यादी ऋषीकेश गोल्हार आणि त्यांचा मित्र अंकेश अशोक दावभट या दोघांना सैन्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी त्यांना बनावट व खोटे नियुक्तीपत्रे दाखवली. या माध्यमातून दोघा संशयितांनी या दोघांची २३ लाख ३९ हजार ३७८ रुपयांची फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांच्याकडे पैशांची मागणी केली केली असता, संशयितांनी त्यांना व्हॉट्सॲपवर धमकीचे मेसेज पाठवून पुन्हा पैसे मागू नका, असा दम दिला. अधिक तपास पोलिस करत आहेत. अधिकृत वेबसाइटवरच भरती प्रक्रिया व अर्जाची माहिती सैन्यात भरती करण्यासाठी कोणतीही बाहेरील व्यक्ती किंवा एजंट तुम्हाला मदत करू शकत नाही. भारतीय लष्कराची भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, संगणकीकृत आणि केवळ गुणवत्तेवर आधारित असते.

मयूर वैद्य व सुनील शिरसाट यांना स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांकडून अटक

पतसंस्था गैरव्यवहार : ठेवीदारांमध्ये अस्वस्थता; ठेवीदारांचे पैसे परत मिळणार का?

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : बालमटाकळी येथील मयूर वैद्य याच्या भगवानबाबा मल्टीस्टेट शाखेचा चेअरमन असलेल्या बोधेगाव बालमटाकळी पाथर्डी शेवगाव श्रीरामपूर अहिल्यानगर दुसरीकडे श्री संत माऊली पतसंस्थेच्या शेवगाव पाथर्डी देडगाव तेलकुडगाव ढोरजळगाव भातकुडगाव खरवंडी कासार या शाखेचा संचालक सुनील शिरसाट यांनी पतसंस्थेतील ठेवीदारांचे पैसे व सोने अडकल्याचा आरोप व करोडो रुपयांचा भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचा संशय ठेवीदारांमध्ये आढळल्याने पाथर्डी तालुक्यात एकच खळबळ उडाली होती याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या काही दिवसांमध्ये पाथर्डी व शेवगाव परिसरातील श्री संत माऊली मल्टीस्टेट निधी आणि भगवानबाबा मल्टीस्टेट या पतसंस्थेला एकाच कालावधीत विविध शाखांना टाळे लागल्याने ठेवीदारांकडून आपल्या ठेवींच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात होती अशातच अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांच्या टीमकडून पतसंस्थेतील गैरव्यवहारांच्या आरोपाच्या गुन्ह्यातील आरोपी मयूर वैद्य याला शिरूर पुणे हद्दीतून तर सुनील शिरसाट याला नाशिक हद्दीतून अटक केली आहे पुढील तपास सुरू असून ठेवीदारांचे पैसे व सोने परतावे परत मिळावेत यासाठी पुढील कारवाई सुरू आहे.

गेल्या काही वर्षात अनेक खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बन यामध्ये गोरगरीब ठेवीदारांचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचे व अनेक पतसंस्थांच्या संचालकांनी करोडो रुपयांच्या ठेवी व सोने घेऊन पतसंस्था बंद करून पोबारा केल्याच्या घटना घडल्या असूनसुद्धा ग्रामीण भागामध्ये पिग्मी एजंट पतसंस्थेचे कर्मचारी नियुक्त करून गोरगरिबांना जादा व्याजदर परतावा आमिष दाखवून शेअर मार्केटच्या धंद्यातून करोडो रुपयांना गंडा घालत आहेत विशेष बाब या खाजगी सहकारी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बनच्या उद्घाटनाला समाजातील प्रतिष्ठित सामाजिक राजकीय व अध्यात्मिक क्षेत्रातील मंडळी उपस्थिती लावत असल्याने गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक व फसवणूक होत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत या खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट अर्बन निधी यावर शासनाने कठोर कायदा करण्याची मागणी होत आहे.

जाहीर प्रगटन

मा. श्री. प्रविण आर शिंद दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अ र्ज क. १४४६/२०२६

ॲड. एम. आर. उबाळे

बळीराम पि. माणिक साबळे व इतर वि. निरंक

अर्जदार : १.बळीराम पि. माणिक साबळे, ४९ वर्षे धंदा शेती, रा.जाधववाडी ता. जि. बीड, २.मधुबाई भ्र. लिंबाजी कवठेकर, वय.५२ वर्ष धंदा घरकाम, रा . पिट्टी ता.पाटोदा जि.बीड, ३. कांताबाई भ्र.विठ्ठल सुवें वय५० वर्ष धंदा घरकाम, रा.सुर्याचीवाडी ता. जि.बीड, ४.शहाबाई भ्र. माणिक साबळे ८१वर्ष धंदा घरकाम रा. सूर्याचीवाडी ता.जी.बीड

५.द्वारकाबाई भ्र. रमेश साबळे, वय ६१ वर्षे धंदा घरकाम राहणार सदर, ६.मनोहर पि. रमेश साबळे वय ४८ वर्ष धंदा- शेती, रा.सदर, ७.नवनाथ पि. रमेश साबळे वय ४५ वर्ष धंदा- शेती रा.सदर, ८.सोमनाथ पि. रमेश साबळे वय४३ वर्ष धंदा - शेती रा. सदर, ९.राणी पि.रमेश साबळे (विवाहापुर्वीचे नाव) राणी पि. रमेश साबळे (विवाहापुर्वीचे नाव)वय ४० वर्ष धंदा- घरकाम रा. संत नामदेव नगर बीड ता.जि.बीड

गैरमर्जदार विरुध्द निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे क्र . १) माणिक पि.कुशाबा साबळे व मयत नामे क्र. २) रमेश पि. माणिकराव साबळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज खल कला आहे. मयत नामे क्र १) माणिक पि.कुशाबा साबळे ते दिनांक १८/०३/२०२३ रोजी चऱ्हाटा ता.जि. बीड येथे मयत झाले आहेत. तसेच मयत नामे क्र. २) रमेश पि. माणिकराव साबळे हे दिनांक ०९/०४/२०२६ रोजी चऱ्हाटा ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे. अर्जदार क्र १.ही मयत नामे क्र १) माणिक पि कुशाबा साबळे यांचा मैदानाचा मुलगा आहे.अर्जदार क्र २ व ३ या मयताच्या विवाहित मुली आहेत तसेच अर्जदार क्र. ४ ही त्यांची आई आहे तसेच अर्जदार क्र. ५ ही मयताची मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयत नामे माणिक पी कुशाबा साबळे यांची सून असून अर्जदार क्रमांक ६ ते ८ मयताचे नातू आहेत. तसेच अर्ज क्र.९ ही मयताची विवाहित नात आहे. अर्जदार क्र. ५ ही मयत नामे क्र.२) रमेश पी मानकर साबळे यांची पत्नी असून अर्जदार क्र.६ ते ८हे त्यांचे मुले आहेत तसेच अर्जदार क्र.९ ही त्यांची विवाहित मुलगी आहे तसेच अर्जदार क्र.४ ही त्यांची आई आहे. मयत नामे माणिक पि.कुशाबा साबळे यांचे आई-वडील बऱ्याच वर्षांपूर्वी मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मेहतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीय पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू, मयत नामे क्र .१) माणिक पि.कुशाबा साबळे व मयत नामे क. २) रमेश पि. माणिकराव साबळे रा.च-हाटा ता.जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, पुढील तारीख २७/११/२०२६. आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित /-
कनिष्ठ लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

जाहीर प्रगटन

मा. श्री पी.एस.घोडके, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज ४३८/२०२६

बाळु विरूध्द निरंक

अर्जदार : १) प्रयागाबाई भ्र.भगवानराव आमटे वय-७६ वर्षे, धंदा-घरकाम रा. खांडेपारगांव ता. जि.बीड, २) भागवत पि. भगवान आमटे वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ३) संजीवनी भ्र. मारोती पैठणे

वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम रा. पिंपळनेर ता. जि. बीड ४) पार्वती भ्र.अभिमान कवचट वय-५५ वर्षे, धंदा-घरकाम रा. बोरदेवी ता. जि.बीड ५) आशाधि भगवानराव आमटे वय-३५ वर्षे, धंदा-घरकाम रा. बोरदेवी ता.जि.बीड

६) भीमाबाई भ्र. भारकर साळुके वय-४९ वर्षे, धंदा-घरकाम रा. खांडे पारगांव ता. जि.बीड ७) उमा भ्र.अशोक दुबाले वय-३७ वर्षे, धंदा-घरकाम रा. मुगगांव ता.जि.बीड ८) सीमा भ्र.दत्ता लांडे वय-३३ वर्षे, धंदा-घरकाम रा. घाटसावळी ता.जि. बीड वि. निरंक मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात भगवान पि. गणपती आमटे रा. खांडेपारगांव बीड, ता.जि. बीड यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत भगवान पि. गणपती आमटे यांचा मृत्यु दिनांक ०५.०१.२०२६ रोजी झाला आहे. वरील अर्जदार १ ते ८ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत भगवान पि. गणपती आमटे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार १ ते ८ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार १ ते ८ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत भगवान पि. गणपती आमटे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४.११.२०२६ आहे.

स्वाक्षरित /-
कनिष्ठ लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

जाहीर प्रगटन

श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १७८८/२०२६

(मार्फत विधिज्ञ: ॲड यु.ए. काचमांडे)

अर्जदार : १. संजुबाई भ्र. वंसतराव शिंदे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, २. गोविंद पि.वंसतराव शिंदे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, ३. गजेंद्र पि. वंसराव शिंदे वय ३७ वर्षे, धंदा शेती, ४. सुरेखा भ्र. चत्रभुज वाणी, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. मन्यारवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

प्रकरण बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे वंसतराव गोविंदराव शिंदे हे दिनांक ०२/०४/२०२६ रोजी मौजे मन्यारवाडी बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. व अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख: २६/११/२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत / -
अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

पालकमंत्र्यांचे हिंगोली जिल्ह्यावरील प्रेम पुतणा मावशीचे

क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा आरोप, ऑनलाईन बैठकीतून दिलेल्या सुचनांमुळे संताप

हिंगोली

हिंगोली जिल्ह्यात अलनिनोच्या प्रभावामुळे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता प्रत्येक गावागावात पाणी वापराच्या काटकसरीबाबत व्यापकप्रमाणात जनजागृती करा अशा सूचना पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी शनिवारी ता. १७ ऑनलाईन बैठकी दिल्या. मात्र पालकमंत्र्यांचे हिंगोली जिल्ह्यावरील प्रेम पुतणा मावशीचे असल्याचा आरोप क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे यांनी केला आहे. पालकमंत्र्यांनी प्रत्यक्ष जिल्ह्यात येऊन माहिती घेणे अपेक्षित होती असे ते म्हणाले.

पालकमंत्री झिरवाळ यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड,पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतचे कार्यकारी अभियंता आर.पी. गरुड, जिल्हा जलसंधारण अधिकारी सोनाली ढोके, हिंगोली नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रांजली मुंडे, जिल्हा परिषदेचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे राजू नरवाडे, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता सुधाकर कचकलवार यांची उपस्थिती होती.पालकमंत्री झिरवाळ म्हणाले की, संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठ्याचे ता. ३१ ऑगस्ट पर्यंतचे नियोजन करावे, जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांतील उपलब्ध जलसाठ्याचे धरणनिहाय पाणी वापर नियोजन करावे. जलाशयाच्या उपलब्ध जिवंत साठ्यापैकी १० टक्के अतिरिक्त बफर, आपत्कालीन साठा राखून ठेवणे, नागरी, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पाणी वापरात १० टक्के कपात करणे, रब्बी हंगामी पिके, चारा पिकांसाठी सिंचन पाळी, आर्वतनाचे वेळापत्रक निश्चति करणे आदी बाबींचाही आढावा पालकमंत्री झिरवाळ यांनी घेऊन योग्य त्या सूचना केल्या.

दैनिक
राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६ | ६

पदवीधर निवडणूकीत बीडचे पंडित, परभणीचे विटेकर काम पक्षाचे करणार की सग्यासोयऱ्यांचे

छ संभाजीनगर । राजेंद्र अजमेरा

मराठवाडा पदवीधर मतदार संघाची निवडणूक आता चांगलीच रंगात आलेली आहे या निवडणुकीत जवळपास ४१ उमेदवार नशीब आजमावत असले तरी महा युतीचे उमेदवार असले तरी अंतर्गत गटबाजी तर महाविकास आघाडी मध्ये मैत्रीपूर्ण लढत अशातच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य असलेले माजी आमदार अमरसिंह पंडित आणि परभणी जिल्ह्यातील आमदार राजेश विटेकर यांचे नातलग असलेले डॉक्टर प्रताप सिंह पाटील हे महाविकास आघाडीचे उमेदवार असल्याने पंडित आणि विटेकर पक्षाचे काम करणार की सग्या सोयऱ्यांचे काम याबाबत आता चर्चा रंगू लागली आहे.

मराठवाडा पदवीधर मतदार संघामध्ये गेली तीन टर्म प्रतिनिधित्व करणारे महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांचा कार्यकाळ पाहिला तर कसा आरसा लक्षवेधी नाही मागील विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाकडून त्यांनी गंगापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती या निवडणुकीत ते पराभूत झाल्यानंतर पुन्हा अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादीत स्वग्रही आले त्यामुळे निष्ठा हा शब्दप्रयोग महायुतीच्या उमेदवारासाठी लागू होत नाही याशिवाय मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ ही शैक्षणिक संस्था मराठवाड्यामध्ये मोठी आहे तेथील कर्मचारी वर्ग किती मदत करतात यावर सर्वस्व अवलंबून आहे दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार म्हणून डॉक्टर







प्रताप सिंह वेद प्रकाश पाटील हे उमेदवार आहेत महाविकास आघाडीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी देखील दिलीप हरिभाऊ घुगे यांना उमेदवारी दिली असल्याने महाविकास आघाडीतील मताची विभागणी चव्हाण यांच्या पथ्यावर पडेल अशी आशा चव्हाण यांना आहे मात्र यासोबतच काही ओबीसी उमेदवार देखील मैदानात आहेत प्रामुख्याने अंतिम टप्प्यात प्रचार आला असून पुढील चार दिवसांमध्ये प्रत्यक्ष मतदान होत आहे विशेष म्हणजे ज्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सतीश चव्हाण आहेत त्याच मंडळावर माजी आमदार अमरसिंह पंडित देखील आहेत ते देखील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आहेत त्यांचेच नातलग म्हणजेच बंधू साडू परभणी जिल्ह्यातील आमदार राजेश विटेकर हे देखील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आहेत मात्र महाविकास आघाडी कडील शरद पवार गटाचे उमेदवार डॉक्टर प्रतापसिंह पाटील हे पंडितांचे सख्खे मावसभाऊ आहेत त्यामुळे पंडित आणि विटेकर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार सतीश चव्हाण यांचे काम करणार की सगळे सोयरे असलेले महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर प्रतापसिंह पाटील यांचे काम करणार हा आता मतदारांमध्ये चर्चेचा विषय बनत चालला आहे बीड जिल्ह्यामध्ये तसे पाहिले तर दोन्ही उमेदवार फारसे ओळखीचे नाहीत त्यातील सतीश चव्हाण ओळखीचे संस्थेच्या असले तरी प्रत्यक्ष मतदारांच्या फारसे संपर्कात नाहीत त्यामुळे एकीकडे नाराजीचा सूर आहे शिवाय माहितीतील भाजप आणि शिवसेना किती काम करते यावर देखील अवलंबून आहे तसे काही झाले तर त्याचा फटका सतीश चव्हाण यांना बसण्याची शक्यता आहे त्यामुळेच दुसऱ्या पक्षात असलेले नात्या व त्यामुळे काम पक्षाचे करणार की सग्या सोयऱ्यांचे करणार यावरच जय पराजय अवलंबून असल्याचे राजकीय जाणकाराचे मत आहे.

माजलगाव-तेलगाव रस्त्यावरील अपघातातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांची मदत द्या!

आ. प्रकाश सोळंके यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव ते तेलगाव या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी.वरील रस्त्याची दुरवस्था आणि अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, माजलगाव-तेलगाव रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करावी, अशी मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दि १९ ऑक्टोबर सोमवार रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार सोळंके यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दि १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव ते तेलगाव या रस्त्याचे काम एमएसआरडीसीअंतर्गत दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या कंपनीकडून करण्यात आले आहे. मात्र, या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असून रस्ता खचल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याची विशेष दुरुस्ती करण्याबाबत राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

या रस्त्यावर वारंवार अपघात होत असून अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी माजलगाव येथून तुळजापूरच्या दर्शनासाठी जात असताना माजलगाव-तेलगाव रस्त्यावरील शिंदेवाडी फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातप्रकरणी ◀◀ पान ३ वर

नारायण गडावरील दसरा मेळाव्याला लाखोच्या संख्येने उपस्थित रहा– अशोक रोमन

बीड । प्रतिनिधी



धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे होत असलेल्या पारंपारिक दसरा मेळाव्याला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोहन यांनी केले आहे दसरा मेळाव्याला येणाऱ्या भाविकांसाठी चराटा फाटा येथे पाणी आणि नाश्त्याची व्यवस्था संघटनेच्या वतीने करण्यात आल्याचेही पत्रकात म्हटले आहे .

मंगळवार दिनांक २० रोजी परंपरेनुसार श्री क्षेत्र नारायण गड येथे मराठा संघर्ष येथे मनोज जरांके पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भव्य दसरा मेळावा होत आहे या दसरा मेळाव्याला लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे या दसरा मेळाव्याला नारायण गडावर जाणाऱ्या भाविकांसाठी सराटा फाटा येथे अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने जवळपास २० हजार पाणी बॉटल आणि नाश्त्यासाठी खिचडी तयार करण्यात येणार आहे तरी भाविकांनी मोठ्या संख्येने नारायण गडावरील दसरा मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन छावा संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक रोमन व बीड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

शॉर्ट सर्किटमुळे चार एकर ऊस जळून खाक

माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव येथील घटना

माजलगाव । प्रतिनिधी

महावितरणच्या गलथान कारभारामुळे माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव येथे शॉर्ट सर्किट होऊन चार एकर उभा ऊस व तीस पाईपं जळून खाक झाल्याची घटना सोमवार दि १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

सुरूमगाव येथील शेतकरी सचिन बालासाहेब माने यांचा ऊस



परिसरातील वीज वाहिनीवरून झालेल्या शॉर्ट सर्किटच्या ठिणग्या पडल्यामुळे पेट घेतला. या दुर्घटनेत सचिन माने यांचे अंदाजे पाच लाख तीस हजार रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या भागात शॉर्ट सर्किटमुळे ऊस जळण्याच्या घटना वारंवार घडत असून, महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने तात्काळ या घटनेची दखल घेऊन शेतकरी सचिन माने यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी आक्रमक मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

दुर्गाष्टमी निमित्त गोपीनाथ गडावरील देवीच्या शक्तीपीठ मंदिरात होम हवन

दरवर्षी नवरात्रात याठिकाणी उत्सव साजरा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नवरात्र महोत्सवानिमित्त आज दुर्गाष्टमीच्या दिवशी गोपीनाथ गडावरील देवीच्या शक्तीपीठ मंदिरात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी होमहवन केले.यावेळी दोन्ही भगिनी भक्ती रंगात रमून गेल्या होत्या.

कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी माता आणि माहूरची रेणुकामाता या तीनही देवीचे शक्तीपीठ मंदिर गोपीनाथ गडावर आहे,



केला जातो, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक भाविक भक्त याठिकाणी दर्शनाला येत असतात. आज दुर्गाष्टमी चे औचित्य साधून ना. पंकजाताई आणि डॉ प्रितमताई यांच्या हस्ते सकाळी मंदिरात होम हवन, आरती व विधीवत पूजा करण्यात आली, यावेळी परिसर भक्तिमय वातावरणाने फुलून गेला होता. आरतीच्या वेळी ना. पंकजाताई झांज वाजवत तल्लीन झाल्या होत्या. यावेळी उपस्थित भाविकांना उपवासाचा फराळ वाटप करण्यात आला.आरतीनंतर ना. पंकजाताई, प्रितमताई यांनी लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्यासाठी उपस्थित रहा–सानप

गेवराई । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेली दसरा मेळाव्याची परंपरा लोकनेत्या तथा मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आजही मोठ्या उत्साहात पुढे सुरू आहे. भगवान भक्तीगडावर आयोजित करण्यात येणारा दसरा मेळावा हा सामाजिक एकजूट, विचारांची देवाणघेवाण आणि समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा महत्त्वपूर्ण सोहळा आहे. या मेळाव्यास मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिक,



समाजबांधव, कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप नेते बाळासाहेब सानप यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपल्या

आज श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दसरा मेळाव्यात संत-महंतांचा आध्यात्मिक संगम!

आ.धस यांच्या अध्यक्षतेखाली धार्मिक सोहळा

आष्टी । प्रतिनिधी

दसऱ्याचा मंगलमय मुहूर्त, नाथ संप्रदायाची गौरवशाली परंपरा आणि संत-महंतांचे सान्निध्य अशा भक्तिमय वातावरणात आज, मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे १८ वा दसरा मेळावा पार पडणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध धार्मिक संस्थानांचे संत-महंत, भागवताचार्य आणि कीर्तनकार एकत्र येणार असल्याने नाथभक्तांसाठी हा दिवस विशेष पर्वणी ठरणार आहे.

आष्टी तालुक्यातील सावरगाव गर्भगिरी पर्वत रांगेतील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड हे नाथ संप्रदायाचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. दसरा मेळाव्याच्या माध्यमातून येथे वर्षानुवर्षे संतपरंपरेचा वारसा जपला जातो.



यंदाच्या मेळाव्यात संत-महंतांचे दर्शन आणि त्यांच्या सान्निध्यात होणारा धार्मिक सोहळा हे प्रमुख आकर्षण असेल.गडाचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी १०.३० ते ११.४५ या वेळेत हा सोहळा होणार आहे. वेळेचे काटेकोर नियोजन करण्यात आले असून, कार्यक्रम निर्धारित वेळेतच सुरू होऊन संपणार आहे. त्यामुळे नाथभक्तांनी वेळेत गडावर उपस्थित राहून दसरा मेळावा आणि सीमोल्लंघन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांच्यासह गडाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त मंडळाने केले आहे.

लाभार्थ्यांनी कागदपत्रांसह नगरपरिषदेशी संपर्क साधावा –सय्यद एजाज

गेवराई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलाचा लाभ घेणाऱ्या ज्या लाभार्थ्यांना विविध कारणांमुळे फेस ऑथेंटिकेशन (चेहरा पडताळणी) करण्यात अडचणी येत आहेत, त्यांच्यासाठी शासनाच्या मानक कार्यपद्धतीनुसार पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करून नियमानुसार अर्जाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन गेवराईचे माजी नगरसेवक सय्यद एजाज



यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी फेस ऑथेंटिकेशन ◀◀ पान ३ वर

'चंपावती दांडिया महोत्सव' ठरला सुपरहिट!

अनिलदादा जगतापांकडून आयोजनाचे कौतुक; विनोद मुळूक यांच्या शुभहस्ते नवदुर्गा पुरस्कारांचे वितरण!



बीड । प्रतिनिधी

शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मराठी पत्रकार संघाच्या वतीने संयोजक सोमेश्वर कदम यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला भव्य-दिव्य 'चंपावती दांडिया महोत्सव-२०२६' उत्साह, जल्लोष आणि अभूतपूर्व प्रतिसादात संपन्न झाला. शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी बीड शहरातील चंपावती इंग्लिश स्कूलच्या मैदानावर पार पडलेल्या या महोत्सवाने बीडच्या सांस्कृतिक विश्वात वेगळीच छाप उमटवली. देवीचे अष्टक घेऊन महोत्सवाचा मंगलारंभ करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते देवीची आरती संपन्न झाली. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप उपस्थित होते. विशेष उपस्थितीमध्ये बीड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, बांधकाम सभापती संजय उडाण, प्रशासकीय अधिकारी राजकुमार कदम, शिवसेनेचे युवा नेते आकाश जगताप व यशराज जगताप, व्यापारी मंगेश लोळगे, यश एंटरप्रायझेसचे विशाल इनकर, पंकज ज्वेलर्सचे संचालक पंकज वेदपाठक, मुक्ताई टेक्स्टाइल बीड शाखेच्या व्यवस्थापक मनीषा कोठेकर, आदित्य थोरात, सचिन नागतिकल, हॉटेल स्पाईस गार्डनचे संचालक, रवी टेकवानी, यश टेकवानी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आयोजन समितीचे विशेष कौतुक केले. या महोत्सवाच्या माध्यमातून महिला-भगिनींना सांस्कृतिक आनंदाचा सुंदर मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी संयोजक सोमेश्वर कदम, प्रतिक कांबळे यांचे अभिनंदन केले तसेच आगामी दांडिया महोत्सव बीड जिल्हा स्टेडियमच्या भव्य मैदानावर आयोजित ◀◀ पान ३ वर

नागरिकांशी संवेदनशिलपणे वागावे, योजनाची माहिती द्यावी–उपमुख्य कार्यकारी अधिकारी बडे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांशी संवेदनशीलपणे वागावे. योजनांची आणि उपक्रमाची नागरिकांची सौंदर्यपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन महिला आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालिदास बडे यांनी केले.



महिला आणि बालकल्याण विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर सर्व क्षेत्रिय कार्यालयातील व जिल्हा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांच्या आयोजित बैठकीत ते होते.याप्रसंगी बोलतांना बडे म्हणाले, कार्यालयात कुठल्याही कामानिमित्त आलेल्या नागरिकांशी सर्वांनी संवेदनशिलपणे वागावे आणि आपल्या कार्यालयातील योजने संदर्भात व्यवस्थित माहिती द्यावी. तसेच सामान्य नागरिकांना इतर कार्यालयाच काम असेल तरी त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. हे माझं काम नाही,आम्हाला माहित नाही. दुसरीकडे बघा जाऊन, मी कामात आहे, नंतर या. मला तेवढेच काम नाही, असे नकारात्मक भावनेतून बोलू नये. सध्या दुष्काळ स्थितीत नागरिकांची मनस्थिती आणि शासकिय कार्यालाकडे असणारी ओढ पाहता अशा परिस्थितीत सर्व शासकिय कर्मचारी यांनी नागरिकांना सहानुभुतिपुर्वक प्रेमाची वागणूक द्यावी, एखादा नागरिक अज्ञानातुन किंवा अस्वस्थेतुन रागाने बोलला तरी त्याला ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26